बी.ए. सत्र चार मराठी साहित्य

# रसयात्रा

## कुसुमाग्रजांचा काव्यविषयक दृष्टिकोण –

विष्णु वामन शिरवाडकर तथा तात्यासाहेब शिरवाडकर हे मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार कथाकार व समीक्षक समजले जातात. त्यांनी कुसुमाग्रज या टोपणनावाने कवितालेखन केले. ते आत्मनिष्ठ व समाजनिष्ठ जाणीव असणारे मराठीतले महत्त्वाचे लेखक मानले जातात. शिरवाडकरांचे वर्णन सरस्वतीच्या मंदिरातील देदीप्यमान रत्न असे करतात. वि.स. खांडेकर यांच्यानंतर मराठी साहित्यात ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे ते दुसरे साहित्यिक होते

कुसुमाग्रजांचा जन्म २७ फेब्रुवारी १९१२ रोजी पुणे येथे झाला .त्यांचे जन्मनाव गजानन रंगनाथ शिरवाडकर त्यांच्या वडिलांचा वकिलीचा व्यवसाय होता. पुण्याहून हे कुटुंब आपल्या मूळगावी म्हणजे नाशिक जिल्ह्यातील शिरवाडे या गावी आले. वयाच्या पाचव्या सहाव्या वर्षी त्यांच्या वडिलांनी आपल्या चुलत घराण्यातील श्रीमती भागीरथीबाई वामन शिरवाडकर यांना दत्तक दिले. त्यामुळे गजानन रंगनाथ शिरवाडकर हे मूळ नाव बदलून विष्णू वामन शिरवाडकर असे नाव दत्तकविधानानंतर झाले

## 1) कुसुमाग्रजांची समग्रतेने आकलन करण्याची वृत्ती –

मराठी आभिरुचीवर चार दशकांपेक्षा अधिक काळ प्रभाव गाजविणारे श्रेष्ठ प्रतिभावंत कवी, नाटककार, कथाकार, कादंबरीकार, लघुनिबंधकार व आस्वादक समीक्षक. प्रामाणिक सामाजिक आस्था, क्रांतिकारक वृत्ती आणि शब्दकलेवरचे प्रभुत्त्व ही त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्यातल्या सखोल सहानुभूतीने त्यांना समाजाच्या सर्व थरांतील वास्तवाला भिडण्यासाठी आणि पौराणिक आणि ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांमधील मानवी वृत्तीचा शोध घेण्यासाठी प्रवृत्त केले. त्यांच्यातल्या शोधक आणि चिकित्सक स्वभावाने त्यांना प्रत्यक्ष ईश्वरासंबंधी प्रश्न उपस्थित करायला आणि माणसाच्या समग्रतेचे

आकलन करायला प्रवृत्त केले. ' पाऊलचिन्हे' ही त्यांची ईश्वराच्या अस्तित्वाचा वेध घेणारी कविता आहे. त्यांचे समृद्ध आणि प्रगल्भ व्यक्तिमत्त्व वैविध्यपूर्ण रूपात त्यांच्या कवितांमधून प्रतिबिंबित झाले आहे. मराठी कुसुमाग्रजांच्या कविता तरुणांना प्रेरणा देणा.या आहेत. त्यांची 'कोलंबसाचे गर्वगीत' ही कविता जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोण व स्फूर्ती देणारी आहे.

## 2) समाजसापेक्ष लेखनविचार

कुसुमाग्रजांच्या साहित्यविचाराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असे त एकाचवेळी लेखकसापेक्ष आणि समाजसापेक्ष आहे. लेखकाच्या अनुभवाला, त्याच्या स्वातंत्र्याला आणि त्याचा व्यक्तिमत्त्वाला कुसुमाग्रज महत्त्व देतात. त्यांच्या मते अनुभव आणि आविर्भाव ही साहित्याचीच नव्हे कोणत्याही मानवनिर्मित कलेची आधारभूत तत्त्वे होत. नावीन्य व अनुभव समृद्धीसाठी लेखकाने सामीलकी आणि सामाजिकतेचा स्वीकार करावा. समाजजीवनातील उपेक्षितांचे अनुभव साहित्यात यावे. त्यासाठी समाज जीवनातील , जातीयता नष्ट होणे गरजेचे आहे, असे कुसुमाग्रज मानतात. ‘साहित्य ही मानवी संसारातील एक समर्थ, किंबहुना सर्वात अधिक समर्थ अशी वस्तू आहे. समाज हा संस्कृतीच्या वातावरणात जिवंत राहत असतो आणि या संस्कृतीच्या प्रवाहात सातत्य ठेवण्याचे, त्याला प्रगत करण्याचे कार्य साहित्य करीत असते, संस्कार करणे हा शब्दांचा स्वभाव आहे. साहित्य हे शब्दाश्रित असल्यामुळे तेही वाचकाच्या किंवा श्रोत्याच्या मनावर कोणते न कोणते संस्कार केल्याविना राहत नाही.

## 3 कलेचे आधारभूत तत्त्व

सर्व संत ज्या अनुभूतीला व आत्मनिष्ठेला महत्त्व देतात त्या अनुभूतीला शिरवाडकर कलेत महत्त्वाचे मानतात त्यांचे म्हणणे असे की लेखकाची अनुभूती अनन्यसाधारण रूप धारण करत तेव्हाच लेखकाला लिहावेसे वाटते. ही प्रक्रिया रसिक वाचक यांच्याशी

संबंधित असून वाचक शब्दांच्या माध्यमातून लेखकाच्या विश्वात प्रवेश करतो यालाच आस्वाद असे म्हणतात.

या अनुभूती, ग्रहण, धारण यांचा प्रेरणेचा समावेश कुसुमाग्रज निर्मितिप्रक्रियेत करतात. त्यांच्या मते वाचकांपर्यंत पोचण्याची लेखकाची इच्छा लेखनाच्या एकूण प्रक्रियेतच समाविष्ट करायला पाहिजे या प्रतिभाव्यापारातून लेखकाला साहित्यनिर्मितीची प्रेरणा मिळते. जग ऐकत आहे हे माहीत असल्यानेच कवी लेखक लिहितो..

## 4 कुसुमाग्रजांचा काव्यानुभव

जे स्थान मर्ढेकर आत्मनिष्ठेला देतात तेच कुसुमाग्रज अनुभवाला देतात या अनुभवाचे अधिक विश्लेषण करताना ते म्हणतात अनुभव प्रत्येक माणसागणिक वेगळा असल्यामुळे एकाच विषयाबाबतही सारखेपणा येत नाही माणसे संपत नाही. माणसाचे अनुभव संपत नाही विषय संपत नाहीत त्यामुळे साहित्यसरितेचा प्रवाह सतत जिवंत, वाहता आणि वाढता ठेवण्याचे कार्य मुख्यत: अनुभवाकडून होत असते शिवाय साहित्याला कलाकृतीचे स्वरूप अनुभवामुळेच येते. कुसुमाग्रज अनुभव आणि आविर्भाव यांचा परस्पर संबंध असा स्पष्ट करतात आविर्भाव.सामर्थ्य प्रभावी असूनसुद्धा योग्य अनुभवाच्या अभावी साहित्याला श्रेष्ठ कलाकृतीचे रूप येणार नाही.

## ५ कुसुमाग्रजांचा काव्यविषयक दृष्टिकोण –

कुसुमाग्रजांच्या मते काव्य हा माणसाच्या भोवतालच्या परिसराशी असलेला संवाद होय. आपल्याला उत्कटपणे जाणवलेले दुसऱ्यापर्यंत पोहोचवणे ही माणसाची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. काव्यातून हा अनुभव दुसऱ्यापर्यंत पोचतो तेव्हा कवीला मीपण व्यापक झाल्याचे समाधान मिळते एकाचा अनुभव अनेकांचा होतो. कुसुमाग्रजांच्या मते हीच काव्यलेखनाची प्रक्रिया व प्रेरणा होय. येथे शब्दांच्या द्वारा कवीचे व्यक्तित्व बाहेर पल्लवीत होते. कवी काव्याच्या साह्याने एक सामाजिक संबंध जोडीत असतो. अशाप्रकारे काव्य म्हणजे अखेरत: कवी आणि वाचक यांच्यामधला एक शब्दांकित. प्रतिमामय संबंध होय. काव्य हा कवीचा आत्मविष्कार असला तरी हा आविष्कार जेव्हा शब्दाचा म्हणजे सामाजिक व्यवहाराच्या

माध्यमाचा आश्रय घेतो तेव्हा तो काव्यरूप पावतो व रसिकांच्या मनाचा ठाव घेतो. कुसुमाग्रजांनी आपला काव्यविषयक दृष्टिकोण समिधाच सख्या या मधून सांगितला आहे. आत्मनिष्ठा हा आपल्या कवितेचा स्थायीभाव आहे असे ते म्हणतात.

समिधाच सख्या या, त्यात कसा ओलावा ,
कोठूनदफुलपरि वा मकरंद मिळावा
जात्याच रूक्ष या, एकच त्या आकांक्षा,
तव आंतर अग्नी क्षणभर तरि फुलवावा!

## 6 सामाजिक असंतोषाचे चित्रण

'रसयात्रा मध्ये सामाजिक असंतोषाच्या ज्वाला धगधगून पेटून उठतात. यामुळे दुभंगलेला समाज,भांडवलशाही, साम्राज्यशाही, हुकुमशाही यांमुळे निर्माण झालेली दरी, खंदक, दु:खितांचे, शोषितांचे अश्रू, असंतोष, चीड, त्वेष हिमलाट, 'फेरीवाला, आगगाडी व जमीन या कवितांतून क्रमाक्रमाने व्यक्त होत गेला हिमलाट कवितेतील हिमलाट ही दारिद्र्याची आहे. मखमाली दुलया जिथे मधुर उबारा देतात. त्या श्रीमंतांच्या महालात या हिमालाटेला अजिबात थारा नाही. ही हिमलाट कडकडून पडते कुठे . तर कुडाच्या झोपड्यांवर आणि कांबळी अंगावर टाकून झोपी गेलेल्या कंगालांच्या अंगावर! परस्परविरोधी चित्रण व्यक्त करणारी ही कविता शेवटी त्या हिमलाटेला धुडकावून लावण्यासाठी यज्ञातल्या व सरणातल्या निखाऱ्यांना आवाहन करते.

## 7 वर्गसंघर्षाचे चित्रण

अहि:नकुल आणि आगगाडी व जमीन या कवितांतही वर्गसंघर्षांचे चित्रण आहे. यात अही व आगगाडी ही प्रतीके शोषकांचे प्रतिनिधित्व करतात, तर नकुल आणि जमीन शोषितांचे प्रतिनिधित्व करतात. यातील अही आणि आगगाडी यांच्या उद्दामपणाची परिणती त्यांच्या अंतामध्येच होणार आहे. या दोन्ही कवितांत कुसुमाग्रजांनी आपल्या उत्तुंग कल्पनाशक्तीचे वैभव पणास लावले आहे. अहि:नकुल कवितेत नागाचे वर्णन करताना उत्प्रेक्षांचा वर्षाव आहे. उदा. ज्वालामुखीला आलेली जाग, प्रमदेचे मादक वस्त्र जणू

सळसळते, अग्नीचा ओघळ ओघळतो जणू मंद , खड्गाचे लवलवणारे लवचिक पाते, यमाची कनकाची कट्यार, तांडवनृत्य करणाऱ्या कालीच्या हातातील कंकण,

संग्राम सरे, रक्ताचे ओघळ जाती,
आनंदे न्हाती त्यात तृणाची पाती, ि
पंजून कापसापरी पडे तो नाग,
ते खंड गिळाया कीटक जमले भोती!

## 8 मानवतावादी दृष्टिकोण

कुसुमाग्रजांनी कवितेबरोबरच नाटक रूपककथा लघुनिबंधही लिहिले. त्यांची कविता असो की नाटक त्यांच्या लेखनात मानवतावादाचं दर्शन आपल्याला सतत घडत असतं. त्यांची कविता सौंदर्यलक्षी असली तरी तिच्यात आवेश आहे, नाटय़पूर्णता आहे. गर्जा जयजयकार, कोलंबसाचे गर्वगीत यांसारख्या अनेक कवितांत आपल्याला ती दिसते. रसयात्रा मधील अनेक कवितांत तर त्या काळातील समाजाची ध्येयवादी मानसिकता दिसून येते. पण अर्थात ती प्रचारकी स्वरूपाची नाही. त्यांच्या अनेक कविता तरल आणि उत्कट भावकविता आहेतच पण त्याचबरोबर त्यांच्या काही कवितांत त्या त्या काळातील सामाजिक वास्तवाचं भानंही दिसून येतं

## 9 प्रेमविषयक दृष्टिकोण

त्यांची सर्वात गाजलेली कविता म्हणजे पृथ्वीचं प्रेमगीत या कवितेत स्त्रीच्या तिच्या मनातल्या आदर्श पुरुषावर असलेल्या प्रेमाची महती गायली गेली आहे. हे प्रेम उत्कट आणि भक्तीसदृश आहे. पुरुषातल्या देवत्वाचं, दिव्यत्वाचं, भव्यतेचं स्त्रीला असलेलं वेड या कवितेत व्यक्त होते. ही कविता पृथ्वीच्या समर्पणाचं द्योतक आहे. 'तुझो गीत', 'आहे ती व्यथेची', ' स्मरण', ' 'शेवटचे पान' आणि 'भावमोहन' अशा अनेक कवितातून वियोग, समर्पण, चिंता हुरहूर, विरहवेदना अशा प्रेमाच्या विविध छटा दिसून येतात.

कुसुमाग्रजांनी ज्या काळात लिहायला सुरुवात केली तो काळ पारतंत्र्याचा काळ होता. त्या काळात लिहिली जाणारी कविता ही देशप्रेमानं प्रेरित झालेली होती 'रसयात्रेत क्रांतीचा जयजयकार, टिळकांच्या पुतळ्याजवळ, जालियनवाला बाग, 'किनारा' अशा राष्ट्रीय स्वरूपाच्या कविता दिसतात. कारण १९४२ नंतर दृष्टिपथात आलेले स्वातंत्र्य हे त्याचे प्रमुख कारण आहे. क्रांतीचा जयजयकार ही रसयात्रेतील राष्ट्रीय वळणाची कविता. अन्नत्याग करून मृत्यूच्या दारात पाऊल टाकणाऱ्या राजबंद्याच्या ओठावरचे गाणे कुसुमाग्रजांनी या कवितेत शब्दबद्ध केले आहे. पिचेल मनगट परी उरातिल अभंग आवेश अशा उन्मत्त इंग्रजी सत्तेला दिलेल्या कणखर आव्हानातून या कवितेची सुरुवात होते. वज्राच्या प्रखरतेपेक्षा क्रांतिकारकांच्या छातीची कणखरता आणि इच्छाशक्तीची प्रखरता अधिक आहे.

कविता या वाङ्मयप्रकारावर कुसुमाग्रजांनी सर्वाधिक प्रेम केले जीवनलहरी पासून कुसुमाग्रजांच्या कवितेचा प्रवास सुरू झाला. त्यांचे काव्यलेखन अनेकपदरी आहे अनेक प्रकारीही आहे त्यामुळेच रसिकांचे, अभ्यासकांचे व समीक्षकांचे लक्ष कुसुमाग्रजांच्या कवितेने वेधून घेतले. रसयात्रा या काव्यसंग्रहातील प्रेमाचे तत्त्वज्ञान, स्त्रीरूपाचा वेध , तारुण्यातील प्रीतीचा कोवळेपणा, त्याचबरोबर स्वातंत्र्याची दुर्दम्य ओढ, क्रांतीचा उद्दाम आवेश, आशावाद, मानवतावादी दृष्टिकोन, वैचारिक जोश ही सारी वैशिष्ट्ये अनुभवास येतात. त्यात एकूण 78 कविता आहेत. मानवाच्या अनंत समस्या, जीवन जगण्यात निर्माण झालेल्या अडचणी, त्यांचा उद्गार त्यांच्या कवितांमधून सातत्याने होत होता. सर्वसामान्य माणसाला हे उद्गार आपलेच आहेत याचा प्रत्यय येऊ लागला. विशाल ,समाजसापेक्ष आणि जीवननिष्ठ असा कुसुमाग्रजांचा काव्यविषयक दृष्टिकोण असल्याचे निदर्शनास येते.

## कुसुमाग्रजांची सामाजिक कविता

कुसुमाग्रजांच्या कवितेत सामाजिक जाणीव अगदी प्रारंभापासून दिसते. त्यांच्या समाजभिमुखतेचे दर्शन त्यांच्या साहित्यातून व काव्यलेखनातून पदोपदी घडते. कुसुमाग्रजांची कविता ही समाजकेंद्री असून समाजवास्तवतेचे यथार्थ चित्र त्यांच्या कवितेतून रेखाटले गेले आहे. समाजातील विविध प्रकारचे दु:ख पाहून त्यांचे संवेदनशील कवीमन व्यथित होते. समाजातील ढासळलेली मूल्ये पाहून त्यांचेमन अस्वस्थ होते. अशा समस्त सामाजिक संवेदनांना कुसुमाग्रजांनी आपल्या कवितेतून अधोरेखित केले आहे.

1) सामाजिक विषमतेवर प्रहार :– आजच्या समाज व्यवस्थेत गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी दिवसेंदिवस वाढतच आहे. सामाजिक विषमतारूपी असणारी ही 'हिमलाट' गरीबांचे जीवन उद्धस्त करीत आहे तर श्रीमंतांना ती अधिक फायदंशीर ठरत आहे. दारिद्रयाच्या या हिमलाटेला महालात थारा नाही. श्रीमंतीच्या भयाने ती घाबरून झोपडीकडे ती वळते. गरीबांच्या झोपडया तिचे संहारक्षेत्र आहे. अशा हुकूमशाही , अत्याचारी व संहारक प्रवृत्तीचा नायनाट करावयाचा असेल तर सर्व गरीबांनी एकत्र येवून प्रतिकार करणे आवश्यक आहे. यासाठी समाजातील सर्व स्तरातील लोकांनी एकजूटपणाने याचा प्रतिकार केला पाहिजे म्हणजेच अन्यायाविरूद्ध एकत्रितपणे लढले पाहिजे असे कवी सांगतात.

ज्योतीतून धावत या तेज:कण सारे
या यज्ञातील वा सरणातील निखारे
रे ढाळ नभा, तव ते ज्वालामय तारे
पेटवूद्याा वणवा कणाकणात मशाली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली !

2) वर्गसंघर्षाचे चित्र :– जागतिकीकरणाचे दुहेरी परिणाम झाल्याचे दिसते. एकीकडे जग जवळ आलं मात्र माणसं एकमेकांपासून दुरावल्या गेली. परस्परांमध्ये आर्थिक आणि सामाजिक संघर्ष निर्माण होवू लागला. कुसुमाग्रजांनी सामाजिक वर्गसंघर्षाचे भेदक चित्रण आपल्या काही कवितांमधून केलेले दिसते. अनेकविध प्रतिकांच्या माध्यमातून ते या वर्ग संघर्षाचे चित्र अधिक

गडदपणे रेखाटतात. 'अहि—नकुल' आणि 'आगगाडी आणि जमीन' या कवितांमधील अहि आणि आगगाडी उन्मत्त शोषकाचे प्रतिनिधित्व करतात तर नकुल आणि जमीन शोषिकाचे. भिन्न असलेल्या दोन जगातील या वर्गसंघर्षाची परिणती शोषकाच्या अंतामध्येच निश्चितपणे होत असते. यात नकुल व जमिनीचा विजय होतो हे सांगून कुसुमाग्रजांनी वर्गसंघर्षातील आशावाद व्यक्त केला आहे.

उद्दाम गाडीचे ऐकून वचन
क्रोधात ईकडे थरारे जमीन
दुर्बल, भेकड, त्वेषाने पुकारी,
घुमले पहाड, घुमल्या कपारी
हवेत पेटला सूडाचा घुमारा
कोसळे दरीत पुलाचा डोलारा
उठला क्षणात भयाण आक्रोश
हारदे जंगल, कापले आकाश
उलटी पालटी होउन गाडी ती
हजार शकले पडली खालती

3) स्थितीशील समाजाचे चित्र :— समाजाची विचारसरणी काळानुसार परिवर्तनशील असली पाहिजे. जुने सोऊून नव्याचा स्वीकार केला पाहिजे अन्यथा जगापासून तुटण्याची अथवा एकाकी जीवन जगण्याची वेळ येते. एकेकाळी कतृत्ववान असलेला माणूस किंवा समाज जेंव्हा जुनाटपणाच्या आहारी जातो, संस्कृतीच्या नावाखली स्थितीशील होतो अशावेळी तो आपलस्वत्व गमावून बसतो. पद ,प्रतिष्ठा आणि पैसा साचा काही एक उपयोग होत नाही. तो समाज अथवा व्यक्ती इतरांपासून तुटतो. अशा बहिष्कृत जीवनापेक्षा त्याला मरणाची प्रतिक्षा करतो. 'विराट वड' मधून कवीने हे विदारक वास्तव रेखाटले आहे.

3) मानवाची अहंकारी वृत्ती :— माणसाने सर्व क्षेत्रात खूप प्रगती केली या स्वनिर्मितीचे सारे श्रेय स्वत:कडे घेत तो स्वत:चेच कौतुक करू लागला, त्याचा त्याला अभिमान वाटू लागला. मात्र तो आपल्या मर्यादा विसरला. आपले पांडित्य, वैभव, सत्तामद, यौवन, सौंदर्य, भव्य निर्मिती

यांच्याबरोबरच आपलाही अंत होणार आहे याचा त्याला विसर पडला व तो सृष्टीतील प्रत्येक घटकावर वर्चस्व गाजवू लागला. पण याचा शेवट मातीतच होणार आहे याची जाणीव मानवाला धुलीकण करून देतात. माणूस कितीही मोठेपणाचा आव आणत असला तरी, त्याच्यावर नियतीचे पुर्णत: नियंत्रण आहे हे मान्य करावेच लागते. अहंकारी मानवाचा शेवट मातीतच आहे हे सत्य सांगणारी 'मातीची दर्पोक्ती' अगदी सार्थ आहे.

4) दुर्दम्य आशावाद :– आजच्या समाजजीवनातील समाजवास्तवाविषयीची चीड व दु:ख या सा–या गोष्टी कुसुमाग्रजांच्या कवितेतून प्रकर्षाने अधोरेखित झाल्या आहेत. पण केवळ दु:ख व वेदना सांगून कुसुमाग्रजांची प्रतिभा थांबत नाही तर या दु:खापासून निर्माण होणारे अश्रू दुबळे नाहीत तर त्यातून दुर्दम्य आशावाद अभिव्यक्त होतो. 'दूर मनो–यात', 'सात', 'कोलंबसाच गर्वगीत' या कविता या दृष्टीने लक्षणीय आहेत. भीषण परिस्थिती समोर दिसत असूनही खलाशी भयभीत होत नाही तर तो आपल्या सहकार्यांच्या मनातील आशावाद जागवतो. ' अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा, किनारा तुला पामराला' या ओळी कोलंबस आणि खलाश्यांना आशेचा किनारा दाखवितात. 'सात' या कवितेतील सातही शिलेदारांना आपण शत्रूला नेस्तनाबूत करू या आशावादामुळे ते त्यांच्या मनातील विश्वासाला ते सार्थ करून दाखवितात. महत्वाकांक्षा आणि अपराजित आशावादी मनोवृत्ती यांचा मनोज्ञ संगंम 'दूर मनो–यात' या कवितेतून व्यक्त झालेला दिसतो.

किरणांचा उघडून पिसारा देवदूत कोणी
काळोखावर खोदित बसला तेजाची लेणी
उज्ज्वल त्याची पहा प्रभावळ दूर मनो–यात
अन् लावा हृदयात सख्यांनो आशेची वात

5) उपेक्षितांच्या अंतरंगांचे चित्रण :– समाजजीवनातील उपेक्षितांचे अनुभव व वेदना कुसुमाग्रजांनी आपल्या कवितेतून यथार्थपणे मांडली समाजजीवनातील उपेक्षितांचे अनुभव साहित्यात यावे. त्यासाठी समाज जीवनातील जातीयता नष्ट होणे गरजेचे आहे असे कुसुमाग्रतांना वाटते. जातिभेदाप्रमाणेच दारिद्य्, अज्ञान आणि ऐहिकनिष्ठेचा अभाव यांचाही समाजजीवनावर विपरित

परिणाम झाला आहे. औदासिन्य आणि दारिद्रयाची छाया समाजावर शतकानुशतके पडली आहे. सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या नावाखाली नको ते विचार लादले जात आहे. या काळोखातून मार्ग काढण्यासाठी प्रतिभा, आणि समाजाप्रती सहानुभूती असलेल्या कुसुमाग्रजांनी उपेक्षितांच्या आणि , वंचितांच्या अनुभवाला व वेदनेला अधोरेखित केले आहे.

6) सामाजिक असंतोष :– सामाजिक असंतोषाचे हुंकार कुसुमाग्रजांच्या अनेक कवितांमधुन अभिव्यक्त झालेले दिसतात. जातीवादामुळे दुभंगलेला समाज , भांडवलशाही, हुकुमशाही यामुळे निर्माण झालेली दरी , शोषितांचे अश्रू, सर्व स्तरातील लोकांमध्ये घुमसणारा असंतांष, चीड, त्वेश ' आगगाडी व जमीन', जा जरा पूर्वेकडे' 'फेरीवाला' आणि 'हिमलाट' या कवितांमधून व्यक्त झाला आहे. सावकाराच्या कर्जाच्या ओझ्याखाली चिरडल्या गेलेल्या शेतक–याचे दारूण आणि करूण चित्र 'लिलाव' मधून यथार्थतेने अधोरेखित झाले आहे. सामाजिक असंतोषाला कुसुमाग्रजांनी आपल्या लेखणीने शब्दरूप दिले आहे.

नको ग नको ग आक्रंदे जमीन
पायाशी लोळत विनवी नमून
धावशी मजेत वेगात वरून
आणिक खली मी चालले चुरून !

7 मूल्य–हास :– जागतिकीकरणाने झालेला मूल्य–हास कुसुमाग्रजांच्या कवितेतून व्यक्त झाला आहे. जगण्याचे संदर्भ बदलत आहे.स्वत:पूरत जगण्याला महत्व दिल्या जातं. 'झाड' या कवितेतून जगण्याचे हे सारे संदर्भ अतिशय वास्तविकपणे व्यक्त झाले आहेत. पक्षाची प्राणांतिक किंकाळी कानी पडूनही संवेदनहीन होणारा समाज आज सर्व दूर दिसत आहे.त्याची कुणालाही खंत नाही. उलट त्याच्या ऐवजी आपण नाही याचे समाधान मानून घेतो. दुस–याच्या दु:खात धावून न जाण्याची व स्वत:पुरताच विचार करण्याची वृत्ती आज सगळीकडे दिसून येते. मानवता, दया, करूणा या मूल्यांचा आज –हास होतांना दिसत आहे. हे समाजवास्तव इथे कवीने मांडले आहे.

मृत्यूच्या करवती दातात जागृत झालेल्या
त्या पाखराने
फोडली असेल पहिली भीषण किंकाळी
आणि तुकडया तुकडयाने शरीर तुटत असतांना
घातल्या असतील हाका भोवतालच्या विश्वाला.
पक्ष्याऐवजी कुरतडली गेली असतील
कदाचित त्याची पिलेही,
पण एक खरे की त्या दहा मिनिटांच्या काळात
परिसरातील एकाही वृक्षाचे एकही पान हलले नाही ,
काहीही शहारले नाही, काहीही उसासले नाही
क्षणार्धात झाले पुन्हा सारीकडे
शांत– शांत !

8 दारिद्रयाचे धृवपद :– माणसाने विकासाचा विचार करतांना आपण विनाशाचया दिशेने तर जात नाही याचे चिंतन करणे आवश्यक आहे दारिद्रय, दैन्य, दु:ख ही याची दुसरी बाजू होय याचाही विचार झाला पाहिजे. अन्यथा सारा विकास फोल , वांझोटा, प्रलयंकारी आहे याचा विचार होणे आवश्यक आहे. जगाच्या या दु:खाला आहे आंधळी जहरी गती. ही जगाच्या विनाशाला कारणीभूत ठरू शकते. हे दु:ख जगासमोर मांडण्याचा व त्याचे निराकरण करण्याचा ध्यास आपल्या लेखणीने घेतला आहे असे कुसुमाग्रज म्हणतात. व हेच त्यांचे ‘धृवपद’ आहे असे ते सांगतात.

माझ्या गीताचे धृवपद एकच आहे.
माणसाच्या माथ्यावर
दारिद्रयासारखा शाप नाही
पृथ्वीच्या पाठीवर
इतके अमंगल, इतके दु:ख्दायक, इतके भेसूर
दुसरे पाप नाही!
जोपर्यंत माझ्याजवळ गीतासाठी शब्द आहेत,
शब्दासाठी श्वास आहे, तोपर्यंत –

याच ध्रृवपदाचा , याच ध्रृवपदाचा

माझ्या गीताला ध्यास आहे !

कुसुमाग्रज अर्थवाही शब्दांद्वारे प्रतिमा व भाववृत्ती उत्कटतेने प्रकट करतात. सामाजिक जाणिवांना अधोरेखित करणारी ही कुसुमाग्रजांची सामाजिक कविता म्हणजे भावगर्भ समाजसूक्तच होय.

## कुसुमाग्रजांची राष्ट्रीय कविता :–

कुसुमाग्रजांनी ज्या काळात लिहायला सुरुवात केली तो काळ पारतंत्र्याचा काळ होता. त्या काळात लिहिली जाणारी कविता ही देशप्रेमानं प्रेरित झालेली होतीच पण त्याचबरोबर निसर्ग, प्रेम तसेच जीवनविषयक भाष्य अशा विषयांवर केंद्रित झालेली होती. कुसुमाग्रजांच्या बहुतेक कविता या राष्ट्रवादी व समाजवादी आशया भोवती फिरताना दिसतात. कुसुमाग्रजांचा लेखनकाळ हा जवळजवळ साठ.सत्तर वर्षांचा. जीवनलहरी हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह १९३३ मध्ये प्रसिद्ध झाला. तेव्हापासून जवळजवळ त्यांच्या मृत्यूपर्यंत म्हणजे १९९९ पर्यंत ते लिहीत होते.

त्यांची कविता असो की नाटक त्यांच्या लेखनात राष्ट्रवादाचं व मानवतावादाचं दर्शन आपल्याला सतत घडत असतं. त्यांची कविता सौंदर्यलक्षी असली तरी तिच्यात आवेश उत्साह वीररस, राष्ट्रवाद व राष्ट्रभक्ती आहे. गर्जा जयजयकार, कोलंबसाचे गर्वगीत, 'आग–याच्या किल्ल्यात' 'स्मरण', 'किनारा' यांसारख्या अनेक कवितांत आपल्याला दिसते रसयात्रा मधील अनेक कवितांत तर त्या काळातील समाजाची ध्येयवादी मानसिकता दिसून येते. पण अर्थात ती प्रचारकी स्वरूपाची नाही. त्यांच्या काही कवितांत त्या त्या काळातील सामाजिक वास्तवाचं व राष्ट्रवादाचं भानंही दिसून येतं. केशवसुतांच्या क्रांतिकारी कवितेशी नातं सांगणाऱ्या या कवीन आपल्या कवितेतून जाज्वल्य राष्ट्रप्रेम जागविले.

### 1 मृत्युंजय कांतिसूक्त :–

क्रांतीचा जयजयकार ही राष्ट्रीय वळणाची कविता. अन्नत्याग करून मृत्यूच्या दारात पाऊल टाकणाऱ्या राजबंद्याच्या ओठावरचे गाणे कुसुमाग्रजांनी या कवितेत शब्दबद्ध केले आहे. पिचेल मनगट परी उरातिल अभंग आवेश. अशा उन्मत्त इंग्रजी सत्तेला दिलेल्या कणखर आव्हानातून या कवितेची सुरुवात होते. वज्राच्या प्रखरतेपेक्षा क्रांतिकारकांच्या छातीची कणखरता आणि इच्छाशक्तीची प्रखरता अधिक आहे. ;राजबंदिवान, कैद्यांनी संहारक कालीलाच आव्हान दिले आहे. मृत्यूपेक्षा स्वदेशाभिमान बलशाली असल्यामुळे देहाच्या कारागृहात कुणीही आम्हाला बंदिवान करू शकणार नाही. कारण आम्ही मृत्यूवरही विजय मिळवला आहे. पायतळी अंगार असतानासुद्धा स्वातंत्र्याच्या ध्येयाने प्रेरित झाल्यामुळे त्या जळत्या निखाऱ्यांना स्वीकारून आम्ही पुढे जात राहिलो. कीर्तीसाठी किंवा प्रीतीसाठी गुंतून न पडता मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी आम्ही झिजत राहिलो, हे वर्णन वाचताना भगतसिंग, राजगुरू, वासुदेव बळवंत फडके, चापेकर बंधू असे तरुण राजबंदी डोळ्यासमोर येतात. शरीरांचा सुखेनैव संहार झाला, म्हणजेच या क्रांतिकारकांची शरीरे नष्ट पावली, तरी स्वातंत्र्याकांक्षा अमर राहील.

आता कर ॐकारा तांडव गिळावया घास

नाचत गर्जत टाक बळींच्या गळयावरी फास

रक्तमांस लुटण्यास येऊ देत क्रूर

पहा मोकळे केले आता त्यासाठी ऊर

शरीरांचा कर या सुखेनैव या सुखेनैव संहार

मरणा, सुखेनैव संहार

गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार

## 2 ईश्वरावर शैतानाची मात

जलियनवाला बागेतील अमानुष हत्याकांड म्हणजे माणूसकीला लागलेला काळिमा आहे असे कवीला वाटते. जालीयनवाला बागेत माणसांची माणसांकडूनच झालेली कत्तल हे भीषण वास्तव पाहून त्यांचे मन पेटून उठते. ही बाब त्यांच्या मनाला अधिक विदिर्ण करते. ज्या ख्रिस्ताने प्रेम, शांती आणि क्षमा यांच्यातच परमेश्वराचे अधिष्ठान आहे , असा आयुष्यभर उपदेश केला आणि त्यासाठी क्रूसावर चढला त्याच्याच अनुयायांनी निरपराध व नि□शस्त्र लोकांवर अंदाधुंद गोळया झाडाव्या हा प्रकार अतिशय निघृण व लज्जास्पद आहे असे कवीला वाटते. ही घटना म्हणजेच ईश्वरावर सैतानाने केलेली मात वाटते. अनुयायांच्या या कृत्यामुळे येशूच्या काळजात आणखीन एक जखम झाली असेल असे कवी म्हणतात,

मर्दांच्या बंदुका उडाल्या मुलाबायकात

जगजेत्यांच्या पराक्रमाची स्फूर्तीप्रद रीत!

पाचोक्यापरि पडली पाहुन प्रेतांची रास

नयन झाकले असतील देवा तू अपुले खास,

असेल ही वा सैतानाची प्रभूवरी मात

एक जखम अन् नवीन येशू, तुझ्या काळजात !

## 3 राष्ट्रवादी दृष्टिकोण

कुसुमाग्रजांनी ज्या काळात लिहायला सुरुवात केली तो काळ स्वातंत्र्य लढयाचा काळ होता. त्या काळात लिहिली जाणारी कविता ही देशप्रेमानं प्रेरित झालेली होती 'रसयात्रे त क्रांतीचा जयजयकार, टिळकांच्या पुतळ्याजवळ, जालियनवाला बाग, 'किनारा' अशा राष्ट्रीय स्वरूपाच्या कविता दिसतात. कारण १९४२ नंतर दृष्टिपथात आलेले स्वातंत्र्य हे त्याचे प्रमुख कारण आहे.क्रांतीचा जयजयकार ही रसयात्रेतील राष्ट्रीय वळणाची कविता. अन्नत्याग करून मृत्यूच्या दारात पाऊल टाकणाऱ्या राजबंद्याच्या ओठावरचे गाणे कुसुमाग्रजांनी या कवितेत शब्दबद्ध केले आहे पिचेल मनगट परी उरातिल अभंग आवेश अशा उन्मत्त

इंग्रजी सत्तेला दिलेल्या कणखर आव्हानातून या कवितेची सुरुवात होते. वज्राच्या प्रखरतेपेक्षा क्रांतिकारकांच्या छातीची कणखरता आणि इच्छाशक्तीची प्रखरता अधिक आहे.

कशास आई, भिजविसी डोळे, उजळ तुझो भाल

रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष:काल

सरणावरती आज अमुची पेटता प्रेते

उठतील त्या ज्वालातून क्रांतीचे नेते

लोहदंड तव पायांमधले खळखळा तुटणार

आई, खळखळा तुटणार

गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार !

## 4 वैश्विक राष्ट्रवाद :–

कुसुमाग्रजांची राष्ट्रवादी जाणीव केवळ स्वदेश आणि स्वकीय यांच्यापुरतीच मर्यादित नाही तर राक्षसी अत्याचार जालीयनवाला बाग येथे घडो अथवा पूर्वेकडील जपान व्हिएतनाम यांसारख्या देशात घडोत. या अत्याचाराचा निषेध त्यांची कविता करतांना दिसतं. ‘ जा जरा पुर्वेकडे’ मधून माणसाच्या अमानुष वृत्तीवर उपहासगर्भ शैलीने भाष्य केले आहे. माणसाने केलेल्या विज्ञानातील प्रगतीचा वापर माणसाच्याच संहारासाठी करीत आहे. निष्पाप, निरपराध बायका मुलांचा संहार केल्या जात आहे. सत्तापिपासा आणि वासनांध वृत्तीमुळे निरागस जीवांची कत्तल करण्यात येत आहे. पूर्वेकडे पेटलेला सत्तासंघर्षामुळे रक्ताच्या नद्या वहात आहे. हे दृश्य बघून कवीमन अस्वस्थ होते. कवीचा मानवतावाद वैश्विक सीमारेषा ओलांडून जातांना दिसतो. देशकालातीत, स्थलकालातीत सर्वस्पर्शित्वाचा इथे प्रत्यय आल्याशिवाय रहात नाही.

खड्ग लावूनी उराला बायकांना वेढती

आणि दारी ओढती,

भोगती बाजारहाटी मांस आणि कातडे

जा जरा पूर्वेकडे !

आर्त धावा आईचा ऐकूनी धावे अर्भक

ना जुमानी बंदूक

आणि लोंबें संगिनीला छान छोटे आतडे

जा जरा पूर्वेकडे !

## 5 युद्धाचा भस्मासूर :–

पुढारलेली राष्ट्रे आपल्या वर्चस्वाच्या आकांक्षेमुळे युद्धाचा भस्मासूर उभा करतात. आणि त्यातून आजवरच्या सव्र मंगल मूल्यांची जी होळी रचतात त्याविषयी कुसुमाग्रजांच्या मनात चीड आहे हे सहज लक्षात येते. 'फेरीवाला' या कवितेतून या विश्व वास्तवाला कुसुमाग्रजांनी मांडले आहे. या कवितेत युद्धाचा भस्मासूर हा फेरीवाल्याचा वेष घेवून आला असून तो आपल्या जवळची हिंसक वृत्ती आणि माणसांचे बळी घेणारा माल  जबरदस्तीने देत आहे. पुढारलेली राष्ट्रांनी आणलेला हा फेरीवाला त्यांच्या निर्घृण सामर्थ्याचे प्रतिक आहे. हा युद्धाचा भस्मासूर समस्त मानवजातीचे लचके तोडत आहे. हे भयावह चित्र कुसुमाग्रजांनी आपल्या कवितेतून रेखाटले आहे.

हा घट देखा यातील  शोणित

मेले तरि अद्याप उधाणत

उमद्याा युवकांचे हो जीवित

रणांगणांवर पिळून त्याचा

घट ताजा भरला !

आला आला फेरीवाला !

## ६ देशासाठी बलिदान

देशासाठी बलिदान देणा–या सैनिकांच्या हौतात्म्यालाही कवीने आपल्या लेखणीद्वारे आदरांजली वाहिली आहे. रंगभूमीवरील नटाने साकारलेल्या  वीराची भूमिकेला आम्ही टाळया वाजवितो पण ख्रा सैनिकांना बघून आमचा कारकूनी पेशाच बरा असं म्हणतो. अशी ही दुहेरी विचारसरणी असणारी माणसे सैनिकांच्या ख–या शौर्याविषयी किती उदासिन असतो हे भेदकपणे 'सैनिक' या कवितेतून कवीने सांगितले आहे. सामान्य सैनिकाचे रोजचे असणारे कष्टमय जीवन आणि रणांगणातले त्याचे उदात्त व समर्पित जीवन याचे समग्र चित्र रेखाटून कवीने त्याच्या वीरश्रीचा गौरव केला आहे. देशासाठी तहान भूख हरपून आणि घर, कुटुंब , अशा सर्वस्वाला तिलांतली देवून प्राणपणाने लढतो.

रेलवेतला सैनिक  पण हा –

करांत त्याच्या दहीवडयाचा द्रोण असू द्या

स्वरात त्याच्या तक्रारीचा भाव दिसू द्या

मुले माणसे –म्हणता त्याचे नेत्र भिजू द्या

जेंव्हा अपुली ( टिनोपॉलची )
मुलकी दुनिया सोडून जातो
रणगाडे–तोफा–तंबूच्या जगात अपुली
जागा घेतो
गळून पडती सर्व जांभया
तक्रारीचा स्वरही विरतो
दूरस्थातील आप्तजनांचा आठव तेथे विद्ध न करतो
मळकट कवचे ( रेल्वेतली ) फुटून पडती
आणि सनातन पुरूषार्थाचा
सोलीव गाभा युद्धतळावर उभा राहतो.

## ७ सामान्य सैनिकांचा गौरव :

कुसुमाग्रजांनी 'खाकी' या कवितेतून सर्वसामान्य सैनिकांचे ध्येयवेड रंगविले आहे. विजयी सेनापतीची किंवा महापराक्रमी वीरांची शौर्यगाथा नेहमीच गायिली जाते. मात्र सर्वसामान्य सैनिका मात्र 'अनामवीर' म्हणूनच रहातात. ही 'खाकी' आणि 'सैनिक' या कवितांमधून कवीने सामान्य सैनिकांची थोरवी गायिली आहे.

खाकीमधला देह असा हा
पृथ्वीमध्ये पिरगळलेले सर्व तणावे,
क्रूरपणाने
तोडून सारे अपुल्या आपण
उन्मादाच्या अशा क्षणाला ,
मरून जातो!
संसाराच्या सीमेवरती
बर्फाच्या मरणाळ तटावर
तिथ पहा ती गर्द लाल रक्ताची धारा
वहात आहे

## ८ हुतात्म्यांचे स्मरण :

आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. पण ज्या वीरांमुळे स्वातंत्र्याचा सूर्य बघावयास मिळाला त्या सर्व वीरांच्या हौतात्म्याची, बलिदानाची जाणीव देशवासियांनी ठेवावी असे कवी म्हणतात. मिरवणूका निघाल्या, स्वातंत्र्याचा आनंदोत्सव साजरा केल्या गेला. मात्र ज्यांच्यामुळे हा स्वातंत्र्याचा प्रकाश बघावयास मिळाला त्या तिमिरातील शतावधी तारंकांचेही स्मरण करावे असे कवीला वाटते. कारण त्यांच्या बलिदानाची राख अजूनही या स्थळी घुमसते आहे . या राखेला मानाचे मुजरे नको किंवा हारतुरेही नको. त्यांना फक्त हवी आहे हृदयामधली आठवणींची एक जागा ,असे कवी म्हणतात

त्या जीवांची जिवंत वा मृत राख इथे साचली

विस्मरणाच्या धुक्यात त्यांची आज कथा लोपली

खुशाल लोपो कालरथाची आहे अखंड गता

पांथा, क्षणभ्र थांबुन केवळ आठव ती आहुती.

कुसुमाग्रजांची समरगीते असो अथवा राष्ट्रीय कविता यातील वीर मरणाची तमा न बाळगणारे असतात. त्यांच्या रा राष्ट्रीय कवितेत शौर्य, बलीदान, समर्पण राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठा, धीरोदात्तपणा राष्ट्रमूल्यांनी ओथंबलेली कुसुमाग्रजांची ही कविता अतिशय हृदयस्पर्शी झाली आहे.

# मराठी कवितेचा प्रवाह

कवितेचा प्रवास सुरु झाला तो ,माझा म.हाटिची बोल कौतुके । परि अमृतातेंही पैजा जिंके म्हणणा.या संत श्रेष्ठ ज्ञानेश्वरापासून. संत ज्ञानेश्वरापासून सुरु झालेला हा कवितेचा प्रवास आजही अखंडपणे सुरू आहे. मराठी कवितेचा विचार करायचा म्हटला की प्राचीन कवितेकडे वळावे लागते. प्राचीन कवितेचे साधारणत तीन प्रवाह मानले जातात.संत काव्य, पंत काव्य आणि ;तंत काव्य शाहिरी काव्य. असे ढोबळमानाने त्याचे वर्गीकरण केले जाते.

## संत काव्य

संत काव्यापासून मराठी काव्याची परंपरा ही सुरु झालेली आहे. बाराव्या शतकापासून सुरु झालेली ही काव्यपरंपरंपरा अठराव्या शतकापर्यंतही दिसून येते. आजही काही काव्यरचना या प्राचीन काव्याशी नातं सांगतांना दिसतात. मात्र ही संख्या अगदी बोटावर मोजता येईल इतकेच भरेल असे वाटते. संतांच्या काव्यात ईश्वर भक्ती, धार्मिक विचार आणि त्याचबरोबर लोककल्याणाची तळमळही काव्यररचनेत दिसून येते. लोककल्याण आणि शिक्षण हा उद्देश दिसत असला तरी ईश्वरभक्तीची ओढ काव्यातून दिसते. संत कविता म्हटले की, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत रामदास यांच्याबरोबर संत मांदियाळातील अनेक संत येतात.

## पंडिती काव्य

काव्यपरंपरेत पुढे परंपरा येते ती पंत काव्याची. याला पंडिती काव्याची परंपरा असेही म्हटले जाते. संत काव्याहून वेगळी अशी रचना पंडिती काव्याची दिसते. पंडिती काव्याचे स्वरूप आख्यानप्रधान असे होते. जसे, रुक्मिणी स्वयंवर,नलदमयंती स्वयंवर. लोकांच्या मनोरंजनासाठी रामायण, महाभारत, भागवत या ग्रंथातला काही भाग निवडून त्यावर अलंकार शृंगाराचा मारा करुन विविध रसांच्या माध्यमातून पांडित्याचे उत्तम प्रदर्शन पंडिती कवींनी केले. पंडितांसमोर विशिष्ट असा श्रोतुवर्ग होता. आणि त्यांना धनिकांचा आश्रय होता. राजे रजवाड्यांच्या आश्रय असल्यामुळे पुराण सांगणे हा त्यांचा व्यवसाय होता. प्रगल्भ लोकांसाठी केलेले साधारणतः त्यांचे लेखन होते. मुक्तेश्वर, वामनपंडित, मोरोपंत, अशी पंडित कवींची प्रदीर्घ परंपरा सांगता येईल

## शाहिरी काव्य

काव्य परंपरेचा प्रवाह आपल्याला पुढे शाहिरी काव्याकडे घेऊन जातो. पोवाड्यात पराक्रमी व्यक्तीच्या प्रशंसनीय घटनांचे रसपूर्ण वर्णन शाहिरांनी केले. आपल्या धन्याचे गुण गौरव शाहिरांनी केले. शिवछत्रपती, सवाई माधवराव, भाऊसाहेब पेशवे, हे शाहिरांच्या लेखणीचे विषय झाले. शाहिरी काव्याला श्राव्यकाव्य म्हणण्या ऐवजी त्याला नाटयकाव्य म्हणावे इतके शाहीर आपल्या काव्याशी एकरूप झाले. पोवाडा वीररसाने ओतपोत भरलेला तर लावणी शृंगाराने सजवली गेली. लावणी जशी शृंगाराची होती तशी लावणी धार्मिकही होती मराठी माणसाच्या सांस्कृतिक परंपरा, संकेत, आदर्श हे लावणी रचनेतून दिसतात. लावणीचे लोकगीताशी जवळचे नाते आहे.

गोंधळगीत, जागरण, वासुदेव अशा लोकगीतातून लावणीनृत्य आकाराला येत गेले. रामजोशी, अनंतफंदी, होनाजी बाळा, सगनभाऊ असे अनेक शाहीर आणि त्यांच्या लावण्या अतिशय लोकप्रिय असल्याचे दिसते

## आधुनिक कविता

पेशवाई गेली इंग्रजी राजवट आली सामाजिक व वैचारिक परिवर्तनाची चळवळ सुरु झाली. या सामाजिक परिवर्तनाचे प्रतिबिंब साहित्यावर देखिल पडले. साहित्याच्या अनेक प्रकारांबरोबरच कविता देखिल बदलत गेली. प्राचीन परंपरेशी आशयाच्या बाबतीत तिने फारकत घेतली. प्राचीन कविता वर्णनपर, कथनपर, अशी होती. नव कविता मात्र स्वातंत्र्य, समता, बंधुतेचा विचार सांगता सांगता समाजनिष्ठ होत गेली. केशवसुतांना आधुनिक कवितेचे जनक म्हणतात कारण त्यांनी काव्याची जुनी वाट सोडून नवी वाट चोखाळली. नवे मूल्य, नवे विचार कवितेतून मांडायला सुरुवात केली. जुन्या रुढी प्रथा परंपरेवर जोरदार हल्ला चढविला. लौकिक विषय काव्याच्या कक्षेत आले. सामाजिक सुधारणांचा विचार, जातिभेद, आर्थिक विषमता आणि निसर्ग असे विषय काव्यातून डोकावू लागले. केवळ कविताच नव्हे तर कवितेचा आकृतिबंधही बदलून गेला.

## नवकाव्य प्रवाह

नैतिक मूल्यावरील कविता, यंत्राच्या संचारामुळे भावशुन्य झालेली माणसे, शेती, शेतकरी, दलित दुबळ्यांचे शोषण, ढोंगीपणा, दांभिकपणा, नैराश्य मानवता, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि राजकीय उदासिनता या आणि अशा आशयांनी मराठी कविता बदलून गेली. तरी नवकवींनी आशय व आकृतीबंधाच्या बाबतीत बराच बदल केला. अत्यंत विदारक आशय,अर्थशून्यतेचा प्रत्यय, विक्षिप्त प्रतिमा, तिरकस शैली ही नवकवितेची वैशिष्टय होय. या कवितेचे अनूभवविश्व व प्रतिमासृष्टी वेगळी होती. आदर्शवाद, स्वप्नरंजन यांच्याकडून ही कविता मानवी दु□खे, स्त्रीपुरूष संबंध यांकडे वळली. सौदर्यवादाकडून वास्तववादाचा तिने अंगीकार केला. वास्तववाद, मुक्तछंदाचा वापर, आशयाचे वेगळेपण, निराशावाद, यंत्रयुगीन वास्तव ही नवकवितेची वैशिष्टये होय.

## स्त्रीवादी कविता

स्त्री संवेदनांना व्यक्त करणारी कविता म्हणजेच स्त्रीवादी कविता होय. स्त्रियांवर होणारा अन्याय, त्यांच्या वेदना, त्यांची होणारी घुसमट, त्यांची स्पने, त्यांच्या अपेक्षा या समस्त स्त्रीविषयक जाणिवांना अभिव्यक्त करणारी कविता म्हणजेच स्त्रीवादी कविता होय. इंदिरा संत, संजीवनी मराठे, शांता शेळके यांनी रविकिरण मंडळाच्या काळात लेखन सुरू केले. १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष होते. १९७५ ते ८५ हे महिला दशक होते. या काळात स्त्रीवादी जाणिवां विशेषत्वाने अधोरेखित झाल्या. प्रभा गणोरकर, नीरजा, अनुराधा पोतदार, मल्लिका अमरशेख, प्रज्ञा लोखंडे, रजनी परूळेकर, अश्विनी धोंगड, हिरा बनसोड, इत्यादींच्या कवितेतून स्त्री वेदना, स्त्री जाणिवा, तिची शारीरिक मानसिक घुसमट, तिचा संघर्ष, तिची भावनिक गुंतागुंत या सर्वांचे चित्र समर्थपणे व प्रभावीपणे रेखाटले गेले आहे.

## साठोत्तरी कविता

१९६० नंतरच्या सुमारास स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा भ्रमनिरास अधिक तीव्र झाला. बेकार तरूण वर्ग संतप्त होता. आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थितीचा प्रभाव वाङ्मयावर पडत होता. तरूणवर्गाची ही उद्विग्नता साहित्यातून व्यक्त झाली विशेषत कवितेतून प्रकर्षाने अधोरेखित झाली. तरूणवर्गाने लघु अनियतकालिकांची चळवळ सुरू केली. अस्तित्ववादी जीवन संवेदना मराठी साहित्यात आणण्याचं काम या चळवळीने केले. १९६० पासून मराठी कवितेवर अस्तित्ववादाची छाया पडलेली दिसते. अस्तित्ववादाचा अनूभव घेत जीवनाचे मर्म उलगडून दाखविण्याचा या कवींनी प्रयत्न केला. माणसामाणसातील विसंवाद, एकाकीपणा, अर्थशून्यता, ही अस्त्तिववादी जाणिवेची वैशिष्टये या कवींच्या कवितेतून अधोरेखित झालेली दिसतात.

## दलित कविता

दलित कवितेला स्वातंत्र्यपूर्व काळाची पार्श्वभूमी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन दलित कवितेची निर्मिती झाली. वेदना, विद्रोह व नकार ही दलित कवितेची तत्वत्रयी आहे. **स्वातंत्र्य, समता, बंधुता, विज्ञाननिष्ठा , न्याय आणि लोकशाही ही मूल्ये दलित साहित्याचा मूलाधार आहेत.** परंपरेमुळे जे अपमानास्पद जीवन जगाावे लागले त्या परंपरेचा निषेध या कवितेतून व्यक्त झाला आहे. परंपरेमुळे सोसाव्या लागलेल्या यातना, अपमानास्पद जगणे, बहिष्कृत जगणे जगणे याचे वास्तवदर्शी चित्र दलित कवितेतून रेखाटले गेले आहे. . या समाजवास्तवाने होरपळलेले कवी प्रल्हाद चेंदवणकर म्हणतात ‘ आयुष्यभर स्वप्नांची चिरफाडच होत गेली, ज्या ज्या वाटांवरून मी चाललो , त्या त्या नाक्यांवर माझी नाकेबंदीच होत गेली’ दया पवार, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर, अर्जुन डांगळे, नामदेव ढसाळ, हिरा बनसोडे इत्यादी कवींच्या कवितेतून दलित संपेदना प्रकर्षाने व यथार्थतेने व्यक्त झाल्या आहेत. ‘`तुफानातले दिवे आम्ही गंगाधर पानतावणे यांच्या ‘अस्मितादर्श’ ने यांना वाङ्मयीन व्यासपीठ मिळवून दिले. दलित कवितेच्या रूपाने एक नवी सामाजिक संवेदनशीलता मराठी काव्यात आली.

## नव्वोदत्तरी कविता

नव्वोदत्तरी कालखंडात मराठी कवितेत अनेक नवनवे प्रवाह अंतर्भूत झाले. तत्रविज्ञानात झालेली क्रांती आणि त्यामुळे बदलून गेलेली जीवनशैली या कालखंडातील कवींच्या कवितांमधून व्यक्त झाली. नारायण काळे, रमेश विसपुते, उन्नादकर, नितीन वाघ, सलील वाघ, संजीव खांडेकर, हेमंत दिवटे, गणेश विसपुते इत्यादी कवींनी समाजवास्तवावर, मनुष्याच्या अस्तित्वावर प्रतिक्रियात्मक कविता लिहिल्या. मराठी कवितेचा इतिहास पाहिला असता तिची विकसनात्मक वाटचाल असे लक्षात येते. संतांच्या रचनांपासून ते आधुनिक कालखंडात प्रत्येत टप्प्यावर मराठी कवितेने धारण केलेल्या नवनव्या प्रवाहांची दखल हिने घेतली आहे. अभंग, ओवी, दशपदी, गझल, लोकगीत, देशभक्ती गीत, चारोळी, खंडकाव्य, महाकाव्य असे तिची अनेक रूपे दिसून येतात. वास्तववादी कविता, सौंदर्यवादी कविता, नवकविता, अस्तित्ववादी कविता अशी तिची अनेक रूपे दिसून येतात. अशी ही मराठी कविता आपला अद्वितीय ठसा उमटवते.

## कुसुमाग्रजांच्या कवितेतील प्रतिमा प्रतिके भाषासौंदर्य

कुसुमाग्रजांच्या काव्यलेखनास चार दशकापेक्षा अधिक कालखंड झालेला आहे. आपल्याला जे जाणवले, आपण जे ग्रहण धारण केले ते इतरांना सांगणे ही मनुष्याची स्वभाविक प्रवृत्ती होय. काव्यातून व्यक्त होणारा अनूभव आस्वद्य होतो. कवीचा अनुभव हा कवीचा न राहता सार्वत्रिक होतो. एकाच वेळी अनेकांचा होतो. कुसुमाग्रजांच्या मते हीच काव्यलेखनाची प्रक्रिया व प्रेरणा होय. आत्मनिष्ठा आणि समाजनिष्ठा ही त्यांच्या कवितेचा स्थायीभाव होय. सामाजिक बांधिलकी हा केवळ अविष्काराचा भाग नसतो तर तर कवीच्या व्यक्तिमत्वाचाही अविभाज्य भाग असतो. कवी आपले अनुभव भाषेच्या पर्यायाने शब्दांच्या माध्यमातून व्यक्त करीत असतो. आपले काव्यानुभव व्यक्त करण्यासाठी योग्य, समर्पक अर्थगर्भ शब्दयोजना करीत असतो. यासाठी भाषेतील प्रतिमा, प्रतिके,छंद यांचीही योजना करीत असतो. त्यामुळे हे काव्य रसाळ व आस्वाद्य होते.

### १ कुसुमाग्रजांच्या कवितेतील समष्टिरूप 

कुसुमाग्रजांचा साहित्यविचार पूर्णत लौकिकतावादी आहे. सामाजिक चिंतनाचा आलेख त्यांच्या काव्यातून प्रतिबिंबित झाला आहे. कलावादाबरोबरच सामाजिक बांधिलकीची जाणीव त्यांच्या काव्यातून निदर्शनास येते. त्यांची कविता व्यष्टिपेक्षा समष्टिरूपाचाच अधिक विचार करते. ती समाजनिष्ठ आहे. कुसुमाग्रजांच्या कवितेचे वैशिष्टय असे की ती समष्टी मनाशी एकरूप होवून ते अनुभव आपल्या कवितेतून करतात. त्यांचे मन हे स्व च्या संकुचित कक्षा ओलांडून पलिकडक झेपावणारे मन आहे. म्हणूनच कुसुमाग्रज हे माणूस आणि समाज यांचे नाते सांधणारे कवी होय. त्यांचे काव्य हे समाजमनाची मनोगते ठरली. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही तत्वे त्यांच्या कवितेतून निदर्शनास येतात.समानता, मानवतावाद, शांती अंहिंसेचा ती पुरस्कार करते.

### २ कुसुमाग्रजांच्या कवितेतील प्रतिके 

कुसुमाग्रज आपल्या काव्यानुभवांना व्यक्त करण्यासाठी प्रतिकांची योजना करतात. त्यामुळे तो अनुभव वाचकांना सहज कळतो. 'आगगाडी आणि जमीन' या कवितेतील आगगाडी ही जुलूम करणा—या व्यक्तीचे प्रतिक आहे तर जमीन ही जुलूम सहन करणा—या व्यक्तीचे प्रतिक आहे असे कल्पून कवीने शोषक आणि शोषीत यातील संघर्ष चित्रित केला आहे. 'अहि—नकूल' मधील अहि हा हुकूमशाही प्रवृत्तीचे प्रतीक आहे तर नकूल हा लोकनायकाचे प्रतिक आहे. हुकूमशहा आणि लोकनायकाच्या संघर्षात नेहमीच लोकनायकाचा विजय होतो असा सकारात्मक विचार अधोरेखित केला आहे. 'हिमलाट' मधील हिमलाट ही विषमतेच्या प्रतिकरूपाने अवतरली आहे. अशा अनेक प्रतिकांच्या माध्यमातून कवीने आपले अनुभवांनी प्रभावीपणे मूर्तरूप दिले आहे.

## ३ कुसुमाग्रजांच्या कवितेतील निसर्ग प्रतिमा □

कुसुमाग्रजांच्या कवितेत निसर्ग प्रतिमांचे प्राबल्य आढळते. कवी आपल्या भावभावनांच्या अविष्करणासाठी निसर्ग प्रतिमांची योजना करतात. विशेषत□ प्रेम भावनेच्या प्रकटीकरणासाठी निसर्ग प्रतिमांचा परिणामकारक वापर केलेला दिसतो. 'स्वप्नाची समाप्ती' मधील प्राजक्ताचे नि□श्वास, तारकांची आसवं, चांदण्यांचे हात, दिवसाचे दूत, प्रकाशाचा सागर, कनकाचे ध्वज, अशा प्रतिमा वियोगाच्या रूपाला आणि प्रियकराच्या खिन्न व उदास मनस्थितीला व्यक्त करतात. 'उष□काल' मधून व्यक्त होणारे प्रेम साफल्य निसर्ग प्रतिमांमधून प्रकार्षाने अधोरेखित झाले आहे. तर 'कोलेबसाचे गर्वगीत'आणि 'दूर मनो—यात' मधील सागराच्या रौद्र रूपाच्या वर्णनासाठी वापरलेल्या प्रतिमा अतिशय यथार्थ व परिणामकारक आहेत. अवसेची रात, पिंजलेली आयाळ, अभ्रांची गर्दी, गुरमरलेल्या तारा, नभामधले दैत्य, प्रमत्त सैतान, वेताळांचा मेळा अशा प्रतिमा सागराच्या रौद्रभीषण रूप आणि खलाशांची असीम महत्वाकांक्षा व्यक्त करण्यास समर्थ आहेत. प्रेमातील संयोग वियोगाची रूपे असो अथवा जीवनाचे मूर्तीमंत चित्रण असो , कुसुमाग्रजांनी आपल्या वैविध्यपूर्ण प्रतिमांच्या माध्यमातून उत्कटतेने रेखाटली आहे.

## ४ कुसुमाग्रजांच्या कवितेतील भाषासौंदर्य □

कुसुमाग्रजांची कवितेता वाचतांना त्यातील भाषासौंदय उत्कटतेने जाणवते. जीवनातील शांती आणि संघर्ष अशी परस्पर विरोधी चित्रे त्यांच्या लेखणीचे साक्षात उभी केली आहे. धरेस दुभंग करणारी हिमलाट, उलटी पालटी होवून क्षणार्धात दरीत पडलेली आगगाडी, मातीची दर्पोक्ती मधील कोसळून पडलेला इमला, जालीयनवाला बाग मधील पाचोळयापरी पडलेली प्रेतांची रास, हिमलाटेविरूद्ध असणारा जनसामान्यांचा आक्रोश, जमीनीचे आक्रंदन—त्वेश, मातीची दर्पोक्ती, क्रांतीची जयजयकार या सगळया भावभावना थेट हृदयाला भिडतात. कवितेतील अनुभव व अविर्भाव जसेच्या तसे नजरेपुढे उभे करण्याचे सामर्थ्य कुसुमाग्रजांच्या प्रतिभेत आहे.

## ५ . कुसुमाग्रजांच्या कवितेतील समराचे प्रतीक □

झुंज आणि संघर्ष यांनु कुसुमाग्रजांनी आपल्या कवितेतून नेमके व प्रभावीपणे रेखाटले आहे. सृष्टीच्या रचनेतच संघर्ष आहे याची जाणीव ते करून देतात. कोलंबसाचा मानवतेचे निशाण लावण्यासाठी व टिळकांचा स्वराज्यासाठी चाललेल्या अपरिमित संघर्षातून आपल्याला शिकवण मिळते. त्यांच्या जीवनसंघर्षात मोठा अर्थ दडलेला आहे. .दोघांच्याही संघर्षाला एक सामाजिक आयाम आहे. टिळकांच्या संघर्षमय जीवनाला कवीन 'जीवित' असे संबोधले आहे. या दोघांचाही संघर्ष आपल्या लक्ष्याच्या परिपूर्तीसाठी केला जाणारा संघर्ष होय. टिळकांचा संघर्ष हा गुलामी विरूद्ध स्वांतंत्र्य असा आहे नवेनवे प्रदेश जिंकण्यासाठी निघालेल्या अपराजित वृत्तीच्या कोलंबसाचा संघर्ष हा जीवन आणि मरणाचा संघर्ष होय. 'गर्ता जयजयकार ' मधील संघर्ष हा परकीय सत्तेविरूद्धचा संघर्ष होय. ' सरणावरती आज आमुची प्रेते ' असे म्हणून मातृभूमीसाठी बलिदान देणा—या क्रांतीवीरांचे हे क्रांतीसूक्त होय. स्वातंत्र्य समराबरोबरच जीवनसमराची विविध रूपे त्यांच्या कवितेतून साकार झाली आहे.

## ६ कुसुमाग्रजांच्या कवितेतील प्रीतीची विविध रूपे 

. कुसुमाग्रजांच्या प्रेम कवितांतून उत्कट प्रेमाची विविध रूपे अभिव्यक्त झालेली दिसतात. त्यांच्या काव्यातून कल्पकतेबरोबरच निसर्ग सौंदर्य, प्रीतीच्या विविध छटा, आणि वास्तविकता योची जाणीव निदर्शनास येते. 'स्वप्नाची समाप्ती' मधील ध्येयासक्त प्रियकर ध्येयासक्त आहे. तर ''प्रीतीसाठी प्रीती' मधील प्रियकर प्रीतीचा गौरव करतांना दिसतो. युगामागूनी युगे सूर्याभोवती फिरणा—या पृथ्वीची समर्पणयुक्त प्रीती दिसून येते. 'पृथ्वीचे प्रेमगीत' मधील पृथ्वीच्या प्रेमाला एक उदात्तता असलेली दिसते. इथे प्रीतीला भव्यतेची जोड मिळालेली दिसते. 'भावमोहन' मधून नि शब्द प्रेमाची महती विशद केली आहे. 'काही बोलायाचे आहे, पण बोलणार नाही' असे म्हणणारा प्रियकर अबोल प्रिती भवनेला एका वेगळयाच उंचीवर घेवून जातांना दिसतां. 'शेवटचे पान' मधील सखीची तिला सोडून जाणा—या प्रियकराविषयी असणारी एकनिष्ठ प्रेमभावना लक्षणीय आहे. कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितेतून प्रेमभावनेचे समस्त विभ्रम बघावयास मिळतात.

## ७ कुसुमाग्रजांच्या कवितेतील शब्दयोजना 

कुसुमाग्रजांनी आपल्या भावाभिव्यक्तीसाठी नेमकी व परिणामकारक शब्दयोजना केलेली दिसते. त्यांचे शब्द कधी मार्दव, मधुरतेने अवतरतात उदा. आशेची वात, उज्ज्वल प्रभावळ, राजवर्खी स्वप्न, प्रकाशाच्या सोनेरी रेषा, तारकादळे, धुंद रातराणी, नवथर बाला, स्वनांचा खजिना, वनदेवी अशा सहजसुंदर शब्दांनी कवितेची रसवत्ता वाढविली आहे कधी कधी भावाविष्कारानुसार कुसुमाग्रजांनी शब्दयोजना कधी कोसळत्या उल्कापाताप्रमाणे धगधगती होते जसे, काळोखाचे तळे, किंकाळीला फुटलेले घुमारे, रात्रीची केसाळ काळोखी त्वचा, विराट वादळ, पाण्याचे पर्वत, वेदनेचे वारूळ, पोलादी टाचा, असे शब्द मानवी वेदनेला व वंचनेला प्रकर्षाने अधोरेखित करतात. तर कधी हेच शब्द धारधार शस्त्राप्रमाणे घायाळ करतात. कृतांताचे विळखे, मृत्युचा मानकरी, शैतान, सरणावरची प्रेते, भुकेली लाव, रक्तमांस लुटणारे गिधाडे, ताम्रसुरा, जीवन—अर्ध्य, अग्नीचा ओघळ, वज्र, रक्ताच्या ध्वजा ईत्यादी अर्थसघन शब्दांनी आशयाला अधिक परिणामकारकता प्राप्त करून दिली आहे.

समाजातल्या विषमतेची जाणीव आणि मानवी मूल्यांचा उद्घोष हे कुसुमाग्रजांच्या कवितेची ठळक वैशिष्टय होय. कुसुमाग्रजांनी आपल्या काव्यानुभवाच्या अविष्कारासाठी भाषेतील प्रतिमा, प्रतिके, शब्द यांची समर्पक योजना केल्याचे दिसते.

## कुसुमाग्रजांची प्रेम कविता

कुसुमाग्रज गेल्या अर्ध्या शतकापासून साहित्यनिर्मिती करीत आहेत. त्यांचे साहित्य विविधतेने नटलेले असून ही विविधता त्यांच्या काव्यलेखनातील आशय व अभिव्यक्तीत दिसून येते. त्यांच्या काव्यात सामाजिक, राजकीय, राष्ट्रीय आणि ईश्वरीय भावनेसोबतच प्रेम भावनाही व्यक्त झालेली दिसते. प्रीतीच्या अथवा प्रणयाच्या विविध रूपांचा वेध त्यांच्या प्रेम कवितांत घेतलेला दिसतो. प्रीतीतील उदात्तता , प्रीतीतील समर्पण, नि:शब्द प्रीती, प्रेमसंयोग, वियोग अशा समस्त प्रेमसंलग्न बाबींचे दर्शन त्यांच्या प्रेमकवितातून घडते. जीवन चिंतन, मानवी संबंध, अथांग यांच्या संयोगातून त्यांची प्रेमकविता फुललेली दिसते.

### १ प्रीतीचे भव्यरूपक :

प्रीतीचा गौरव करणारी उत्कट प्रमाची हळूवार चित्रे कुसुमाग्रजांनी आपल्या प्रेमकाव्यातून रंगवलेली आहेत. 'पृथ्वीचे प्रेमगीत' हे प्रीतीचे भव्य रूपक त्यांनी निर्माण केले आहे. 'नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा, तुझी दूरता त्याहूनी साहवे' असे म्हणणारी पृथ्वी जणु हळव्या प्रेमभावनेला दिव्यता प्रदान करीत आहे. प्रेमाला एक भव्यरूप देत आहे. या कवितेत कवीने प्रीतीच्या भव्यतेचा, उदात्ततेचा गौरव केला आहे. प्रीतीची ही भावना ही समर्थ व दिव्य असून ही युगानुयुगापासून अस्तित्वात असलेली दिसते. इथे समर्थ प्रेमाचा साक्षात्कार होतांना दिसतो. इथे कवीने शृंगाराला उदात्ततेच्या , अलौकिकतेच्या पातळीवर नेल्याचे दिसते. ही कविता पृथ्वीच्या समर्पणाचं द्योतक आहे. तिच्या प्रेमाला उदात्ततेची किनार आहे. सूर्यासारख्या तेजस्वी व स्यंप्रकाशित पुरूषाच्या प्रेमासमोर इतरांचे प्रेम तिला नकोसे वाटते. सूर्याने केलेला प्रेमाचा अस्वीकार तिला मान्य आहे पण त्याच्या तेजाने प्रकाशित होणा—यांचे प्रेम तिला अमान्य आहे. इथे तिची सूर्याठायी असणारी निष्ठा दिसून येते.

परी भव्य ते तेज पाहून पूजून

घेऊ गळयाशी कसे काजवे

नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा

तुझी दूरता त्याहुनी साहवे!

### २ ध्येयासक्त प्रियकर :

प्रीती किंवा प्रणय ही जीवनातील अतिशय स्वभाविक भावना असून म्हणूनच बहुतेक कवींच्या कवितांमधे प्रेमकविता आढळतात. कुसुमाग्रजांनीही वैविध्यपूर्ण प्रेमकवितां लिहिलेल्या दिसतात. प्रीतीची ही भावना नैसर्गिक , स्वभाविक व उत्कट असली तरी या प्रेमभावनेची अनुभूती प्रत्येकाला प्राप्त होईलच असे नाही. सर्वसामान्यपणे प्रेमजीवनातील संयोग वियोगाची रूपे अनेक कवींच्या प्रेतकवितांमधे दिसतात मात्र कुसुमाग्रजांनी ध्येयासक्त प्रियकराची व्यथा 'स्वप्नाची समाप्ती'मधून शब्दांकित केली आहे. ध्येयासक्त पुरूष प्रेमात पडू शकतो, मात्र सफलता त्याला प्राप्त होईलच असे नाही हीच वास्तविकता 'स्वप्नाची समाप्ती' मधील ध्येयासक्त प्रियकर समजून घेतो आणि ती स्विकारतो. हा प्रियकर ध्येयासक्त असूनही संयमी आहे. जीवनातील वास्तवाची अपरिहार्यता तो धैर्याने स्विकारतो. आपल्या सखीला देखिल त्याची जाणीव करून देतो.

ध्येय,प्रेमआणि आशा यांची पूर्तता जीवनात होईलच असे नाही हे सांगून तरी देखिल मनुष्य यांची अभिलाषा करतो असे स्पष्ट करून तो आपल्या सखीची समजूत काढतो. दोघांनी असं परस्परापासून दूर होण्यास ती तयार नाही हे पाहून तो तिची पुन्हा समजूत काढतो व ध्येयासाठी तिला सोडून जाण्याचा घेतलेला निर्णय तिला पटवून देतो. ध्येय आणि प्रेम यापैकह ध्येयाचे महत्व प्रतिपादन करणारी ही कविता जीवनातील वास्तवाचीही जाणीव करून देते.

होते म्हणू स्वप्न एक
एक रात्री पाहिलेले
होते म्हणू वेड एक
एक रात्री राहिलेले,
प्रकाशाच्या पावलांची
चाहूल ये कानावर
ध्वज त्याचे कनकाचे
लागतील गडावर
ओततील आग जगी
दूत त्याचे लक्षाचधी
उजेडात दिसू वेडे
आणि ठरू अपराधी

## . ३ प्रेमकवितेतील विरह :

प्रणयातील विरहाचा उच्चार कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितेतून झालेला दिसतो. प्रेमाची परिणिती मीलनात व्हावी असे प्रेमी युगुलाला वाटत असले तरी बरेचदा ब—याच प्रेमीजनांच्या नशिबी विरह व्यथा येते. ‘शेवटचे पान’, ‘स्मरण’, ‘मातीचे गायन’, ‘स्वप्नाची समाप्ती’, ‘पृथ्वीचे प्रेमगीत’ या सगळया कवितेतून विरहवेदना अभिव्यक्त झालेली दिसते. ‘क्षणाच्या सहवासाने जन्माची वेदना देणा—या मुशाफिर प्रियकराला माघारी फिरण्याची विनवणी करणा—या प्रेयसीचे शेवटचे पान ही आर्त गीत होय. प्रियकरावर जीव ओवाळून टाकणा—या निष्ठावान प्रेयसीच्या प्रेमभावाचे हे विरहगीत होय. ‘स्मरण’ मध्ये विरहवेदनेत मीलनाच्या क्षणांच्या आठवणी विरंगुळा देतात, ही भावना व्यक्त झाली आहे. ‘नाही’तून विरहवेदनेने व्याकुळ झालेल्या निष्ठावंत पण मानी प्रियकराचे बोल जीवाला चटका लावतात. ‘ती’ च्यामुळे हा प्रियकर ‘वणव्याचा धनी’ झाला असला तरी, विरहाग्नीच्या निखा—याची आंच तिला लागू देणार नाही असे तो म्हणतो. ‘शिलारूप’ मधून पराक्रमी पुरूषाची प्रेमव्यथा प्रकर्षाने निदर्शनास येते. सार्वत्रिक जीवनाच्या असणा—या मर्यादांमुळे त्याला ही व्यथा सोसणे नशिबी येते. प्रेमाच्या साम्राज्यात विरह ही गोष्ट स्वभाविक असली तरी ती आपल्या जीवनात येवू नये असेच प्रेमीजनांना वाटत असते. ही विरहवेदना कुसुमाग्रजांनी आपल्या कवितेतून समर्थपणे अधोरेखित झाली आहे.

## ४ प्रीतीसाठी प्रीती :

प्रीतीसाठी प्रीती ही कवीची प्रीतीविषयक बदललेली भूमिका होय. इथे प्रीती ही 'चिरंजीवनी' , 'उदात्त', आणि 'ईश्वरी भावना' आहे असे कवी म्हणतात. प्रीतीसाठी प्रीती मधील प्रियकर प्रीतीलाच महत्व देतांना दिसतो. अधिक विवेकाने प्रीतीकडे पाहतांना दिसतो. स्वप्नांच्या समाप्तीत असणारा प्रेमविषयक दृष्टिकोण प्रीतीसीठी प्रीतीमध्ये बदललेला दिसतो. या अशाश्वत जगात सगळेच नष्ट होणारे आहे. म्हणून भविष्याची चिंता न करता कां प्रीतीची आनंद उपभोगू नये ? असा तो विचार करतो. आलेल्या क्षणांचे सोने करून घ्यावे. जीवनात सगळया गोष्टी महत्वाच्या आसल्यातरी प्रीतीइतकी महत्वाची व आनंददायी नाही. ही बाब कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितेतून जाणवते.

## ५ उदात्त प्रेमभावना :

कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितेतून प्रेमाच्या उदात्ततेबरोबरच समर्पण भावनेचेही दर्शन घडते. बरेचदा प्रियकर प्रेयसीला प्रेमात सफलता मिळत नाही प्रेमात मीलनापेक्षा जेंव्हा वियोग सोसावा लागतो अशावेळी त्याचा राग मनात ठेवून एकमेकांवर सहाजिकपणे दोषारोपण केल्या जाते. मात्र कुसुमाग्रजांच्या कवितेतून निरपेक्ष, निरालस प्रेमाची प्रचीती येते. विरहव्यथा सोसावी लागूनही उलटपक्षी इथे प्रियकर आपल्या सखेच्या उज्ज्वल आणि आनेदमयी आयुष्याची कामना करतो. कुसुमाग्रजांच्या कवितेतील ही समर्पण भावनाच कवितेला श्रेष्ठत्वाच्या पातळीवर नेते. 'पृथ्वीचे प्रेमगीत' मधील पृथ्वी असो, 'मातीचे गायन'मधील माती असो किंवा 'नाही' मधील प्रियकर असो वियोगाचे दु:ख सोसूनही आपल्या जोडीदाराविषयीची त्यांची समर्पण भावनाच निदर्शनास येते. पृथ्वी सूर्याशी , माती आकाशाशी एकनिष्ठ असल्याचे दिसते. तर प्रियकर आपल्या प्रियेच्या आठवणीतच समाणन मानतो. इथे प्रेमाला असलेली अलौकिकता, उदात्तता दिसून येते.

## ६ प्रेमातील संयंम :

कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितेतील सेयंमामुळे त्यांच्या अनेक प्रेमकवितांना भक्तीची किनार असलेली दिसते. 'स्मरण' मधील नायकाच्या ठिकाणी ही संयमित वृत्ती दिसते. सखीमुळे जन्माची विरहव्यथा सोसावी लागत असली तरी त्याच्या मनात तिच्याविषयी असणारी प्रेमभावना यत्किंचितही कमी झालेली दिसत नाही. तिने एवढे दु:ख देवूनही तिच्याविषयी त्याचे मन अजिबात कलुषित नाही. उलटपक्षी तो सदैव तिच्या आनंदाचीच कामना करतो. इथे त्याच्या उत्कट प्रेमाबरोबर त्याच्या संयमित वृत्तीचीही साक्ष पटते. 'स्वप्नाची समाप्ती'मधील प्रियकर धीरोदात्तपणे वियोगाचा स्वीकार करावा असे आपल्या सखीला स्मजवून सांगतो. सूर्याशी आपले मीलन अशक्य आहे हे ठावूक असूनही पृथ्वाी वास्तवाचा संयमाने स्वीकार करते. सूर्यावर असणारी तिची निष्ठा कायम आहे आणि पुढेही कायम रहाणार आहे. संयमितपणा हा ख—या प्रेमाचे वैशिष्टय आणि मुख्य गुण होय. या गुणाचे दर्शन कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितांमधून घडते.

## ७ कोमल प्रीती भावना :

प्रीतीची ही भावना अतिशय कोमल आणि सुकुमार असल्याचे दिसते. 'पुनव', 'उषास्तवन', 'उष:काल' सा कवितांमधून ही विशेषत्वाने निदर्शनास येते. कार्तिक पुनवेच्या विशुद्ध लावण्याने फुललेल्या मनाचा कोमल प्रीतीभाव 'पुनव' मध्ये मोहरलेला आहे, ही भावना व्यक्त करण्यासाठी दिलेल्या उपमांमधू नही सुकुमारता शब्दोकित झाली आहे. 'उषास्तवन' मध्ये उषेने अनिरूद्धाविषयीचे स्वप्न आपल्या सखीला सांगितले, त्यातून उषेने अनिरूद्धाच्या प्रेमात रंगलेले तिचे मन हळूवारपणे आपल्या सखीजवळ उलगडले आहे. 'उष:काल'मधील प्रियकरही रात्री क्रीडा व विहार करण्यासाठी आलेल्या वनदेवींनी स्वप्नाचा व सौंदर्याचा 'खजिना' आपल्या जीवलग सखीसाठीच ठेवून गेल्या आहेत असं तो म्हणतो. प्रीतीच्या या नाजुक रेशीमबंधाचा अविष्कार कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितेतून व्यक्त झाला आहे. प्रीतीच्या या नाजुक सुकुमार रूपाची अपूर्वाई इथे मनाला भुरळ घालते.

## ८ अनाकार दु:खाला आकार :

प्रेमाची उपेक्षा किंवा अवहेलना झाल्यानेतर जाणवणा—या अनाम ,अरूप आणि अनाकार दु:खाला आकार देण्याचा प्रयत्न कुसुमाग्रजांनी केला आहे. प्रेमाच्या प्रांतात कधी कधी उपेक्षाही नशिबी येते.अशावेळी जाणवणारे दु:ख निराकार व अतीव असते. हे दु:ख दिसत नाही पण ते ह्रदयाला घयाळ करते. म्हणून कुसुमाग्रज निराकार ,अनाम असे संबोधतात. या दु:खाला आकार, नाव नसते पण त्याची सल ह्रदयात सतत टोचत राहते. ही अमूर्त वेदनेला कुसुमाग्रजांनी शब्दरूप दिले. संकोचाचे पडदे बाजूला सारून प्रेमाविषयीचा मोकळा अविष्कार त्यांच्या प्रेमकवितातून झालेला दिसतो. आर्जव, व्याकुळता, निशब्दता, समर्पण, विरहव्यथा, वियोगावस्था, हुरहूर, या सगळया भावभावनांची गुंफण कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितातून निदर्शनास येते.

अशाप्रकारे प्रेम आणि प्रणयाच्या समस्त छटांना अविष्कृत करणारी कुसुमाग्रजांची प्रेमकविता वैविध्यतेने नटलेली दिसून येते.

# काव्यशास्त्र परिचय

## प्रकरण पहिले –काव्यकारण

प्रतिभेची वैशिष्टय – काव्यनिर्मितीला कारणीभूत असणारी तीन कारणे संस्कृत साहित्यज्ञानी सांगितली आहेत.प्रतिभा , व्युत्पन्नता आणि परिश्रम ही ती कारणे होत. प्रारंभी दंण्डीने या तीनही शक्ती मिळून एक काव्यकारण होते असे सांगितले आहे.

१ दण्डी – प्रतिभा, श्रुत आणि अभियोग

२ मम्मट – शक्ती , निपुणता आणि अभ्यास

३ हेमचंद्र आणि वाग्भट – शक्ती , निपुणता आणि अभ्यास

४ जगन्नाथ – काव्यगत प्रतिभा हेच केवळ एकमेव कारण आहे.

५ राजशेखर – प्रतिभा, अभ्यास आणि बहुश्रुतता ही काव्यकारणे सांगितली आहेत.

या सर्व साहित्यज्ञांच्या मतावरून प्रतिभा ही अत्यंत श्रेष्ठ आणि आवश्यक काव्यशक्ती आहे आणि तिच्या खालोखाल असणारी अन्य काव्यकारणे म्हणजे व्युत्पत्ती व अभ्यास ही होय. प्रतिभा ही माणसाच्या मनाची नाविन्यपूर्ण व गूढ शक्ती आहे.ही काहींच्याच ठिकाणी आढळत असल्याने हिला अलौकिक व दैवी शक्ती असेही म्हटल्या जाते.

**प्रतिभेची वैशिष्टये** – प्रतिभा, व्युत्पत्ती व अभ्यास ही काव्यनिर्मितीला कारणीभूत असणारी तीन महत्वपूर्ण व आवश्यक कारणे आहेत. प्रतिभा नसेल तर काव्य निर्माण होणार नाही. या प्रतिभेची वैशिष्टये खालील प्रमाणे सांगता येतील

१ **प्रतिभाव्यापार** – प्रतिभावंत साहित्यिकाचे मन संवेदनशील असते. तो जे बघतो, अनुभवतो ते सर्व त्याच्या मनात ठसत असते. त्याची ग्रहणशक्ती, स्मरणशक्ती हे ठसे जतन करून ठेवते. या अनुभवातील योग्य भाग घेवून आपल्या भाषाप्रभूत्वाच्याद्वारे त्या घटनांची अथवा प्रसंगांची पुनर्रचना करतो आणि काव्यनिर्मिती करतो. प्रतिभावंत साहित्यिकाचा हा जो मनोव्यापार चालतो यालाच **'प्रतिभाव्यापार'** असे म्हणतात.

**कल्पनाशक्ती** हा प्रतिभेचा महत्वपूर्ण घटक आहे. सामान्य माणसाला न दिसणा—या सत्याचे दर्शन हा लेखक आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर घडवतो. लेखक हा शब्दसृष्टीचा ईश्वर असतो. आपल्या शब्दशक्तीच्या आधारावर एक नवी कल्पित मनोहर शब्दसृष्टी निर्माण करतो. ही मोहक शब्दसृष्टीचा घडत असतांना त्या साहित्यिकाच्या मनात ज्या घडामोडी आकार घेतात त्यालाच प्रतिभाव्यापार असे म्हणतात.

२ **प्रतिभा  एक अलौकिक शक्ती —** कवीला एखादी कल्पना कशी सुचते ? लेखकाद्वारे एखाद्या प्रसंगाची उत्कट मांडणी कशी केल्या जाते ? या प्रश्नांची उत्तरे संबंधित साहित्यिकालाही देता येत नाहीत. एखाद्या साहित्यिकाची प्रतिभा कशी कार्य करते सांगता येत नाही. प्रतिभेची दुर्मिळ देणगी लाभलेला कवी तिच्या स्वरूपाविषयी निश्चितच भांबावून जातो, हे दिव्य सामर्थ्य ईश्वराचेच आहे आपण केवळ निमित्तमात्र आहोत असे त्याला वाटते. . ज्या शक्तीचे मूळ आपल्याला सापडत नाही अथवा त्याची कार्यपध्दतीचे स्वरूप उमगत नाही तेंव्हा त्या शक्तीला ईयवरी कतृत्व अथवा अलौकिकत्व देण्याचा माणसाचा स्वभाव असतो. या प्रवृत्तीला अनुसरूनच प्रतिभा ही अलौकिक शक्ती मानली जाते. **विरलत्व** हा प्रतिभेचा मुख्य गुण आहे. फार कमी लोकांकडे ती भरपूर प्रमाणत असते. प्रतिभा ही मानसिक शक्ती आहे. वक्तृत्व, पाठांतर, स्मरण या शक्ती माणसात सम प्रमाणात नसतात.

**३ प्रतिभा ही वेडाची बहीण —** गुन्हेगारीची शास्त्रीय मीमांसा करणारा संशोधक सिझर लोंब्रोसो याने हा सिध्दांत मांडला आहे. आपल्या सिध्दांताच्या समर्थनार्थ त्याने काही प्रतिभावंतांची उदाहरणे दिली आहेत. रस्त्यात उभे राहून तासंतास विचार करणारा सॉक्रेटिस, अंघोळ करतांना उघडानागडा टबातून बाहेर येवून ‘ युरेका—युरेका’ म्हणून ओरडणारा आर्किमिडीज, प्रियेचा ध्यास घेवून खिडकीतून लोंबणा—या सापाला धरून वर चढून जाणारे तुलसीदास अशा काही प्रतिभावंतांच्या प्रतिभेत वेडसरपणाच्यर छटा मिसळलेल्या दिसतात. लोंब्रोसो याच्या मते, प्रतिभा ही मनाची विकृती असून प्रतिभावान लोकांमध्ये या मानसिक विकृतीची अंश जेंव्हा प्रबळ होतो, त्यावेळी काव्य निर्माण होते. म्हणजेच प्रतिभा ही वेडाची बहीण आहे असे तो म्हणतो.

प्रतिभावान लोक वेडाच्या लहरीत काव्य करतात, असे त्याला आढळले असले तरी ते अर्धसत्य आहे. काही लोक वेडाच्या लहरीत कावय करीत असले तरी बहुसंख्य वेडयांन काव्यरचना करता येत नाही. वेडे लोक वेडाच्या लहरीत काव्यरचना करीत असले तरी त्यांची ती काव्यरचना सलग, संपंन्न व वैविध्यपूर्ण कधीच नसते. बहुसंख्य प्रतिभावान वेडे होत नाहीत आणि बहुसंख्य वेडे हे काव्यरचना करू शकत

नाहीत हे पूर्णसत्य आहे.म्हणून  प्रतिभा ही वेडाची बहीण नसून उपयुक्त अशी मानसिक शक्ती आहे.हेच बरोबर आहे.

**४ अपूर्व वस्तुनिर्मितीक्षम प्रतिभा □–** प्रतिभा ही अपूर्व वस्तूंची निर्मिती करते असे अभिनव गुप्त म्हणतात. साहित्यिक आलेल्या अनुभवातील निवडक अनुभव घेतो त्यातील नको असलेला भाग वगळतो त्याची मांडणी, मिश्रण, एकत्रीकरण, संगती, संकलन अगर समन्वय वेगळया पध्दतीले करून त्यातून एक नवे अनुभवचित्र साकारतो. नवी साहित्सकृती निर्माण करतो. हीच त्याची अपूर्व नवनिर्मिती होय. अपूर्व म्हणजे पूर्वी नसलेली म्हणजेच पुनर्रचित दृ अनुभ्वांची जुळणी करून त्याची आकर्षक मांडणी करणे हे प्रतिभेचे कार्य होय.

## प्रतिभेच्या विविध व्याख्या □–

**१ दण्डी □–** ‘ **प्रतिभा** म्हणजे पूर्वजन्मीच्या वासनागुणांवर अवलेबून असणारे ज्ञान होय’ दण्डीच्या मते प्रतिभा ही माणसाला सामान्यपणे जन्मत□च मिळते.

**२ मम्मट □–** ‘ **प्रतिभा**शक्ती म्हणजे  काव्यबीजरूपी विशिष्ट संस्कार आहे. ही शक्ती नसल्यास काव्यच प्रसृत होणार नाही किंवा झालेच तर ते उपहासनीय होईल’ कवित्वाच्या मुळाशी असणारा संस्कार म्हणजे प्रतिभा होय असे मम्मट म्हणतो.

**३ वाग्भट आणि हेमचंद्र □–** ‘प्रतिभा म्हणजे नानवीन उन्मेष धारण करणारी प्रज्ञा होय’ वाग्भट आणि हेमचंद्र यांच्या मते प्रतिभा ही साहित्यकृतीतील प्रसंगवर्णन अथवा व्यक्तिवर्णनात नावीन्य आणणारी मानसिक शक्ती व नवनवीन कल्पना सुचविणारी कल्पना शक्ती होय.

**४ अभिनव गुप्त □–** ‘अपूर्व वस्तू निर्माण करणारी प्रज्ञा म्हणजे प्रतिभा होय’ साहित्यकृतीतील कथानक, व्यक्तिदर्शन, कल्पना, तिची मांडणी, सजावट या सर्वच बाबींची समावेश वस्तूनिर्मितीमध्ये होतो.

**५ रूद्रट □–** ‘मनाची समाधी लागली असता वर्णनीय विषयांसंबंधी अनेक प्रकारांनी होणारे विस्फुरणज्या शक्तीने होते व ज्या शक्तीमुळ उचित  शब्द आपोआप स्फुरतात, अशी शक्ती म्हणजे प्रतिभा होय’ रूद्रट प्रतिभेचे दोन प्रकार मानतात. सहज आणि उत्पाद्य हे ते दोन प्रकार आहेत. सहज प्रतिभा कवीला जन्मत□च लाभते दृ उत्पाद्य प्रतिभा  शास्त्राच्या अभ्यासाने अथवा मणि–मंत्र–औषधी यांच्या योजनेने लाभते. यातील साज प्रतिभा हीच श्रेष्ठ प्रतिभा होय.

## प्रतिभेचे विविध कार्य / अंगे

**१ ग्रहण किंवा धारण** — प्रतिभावान माणसाचे मन संवेदनशील असते. मो जे बघतो, ऐकतो, अनुभवतो त्या सर्वांचे ठसे त्याच्या मनावर उमटतात. सृष्टीतील विविध दृष्यांचे , जीवनातील घटनांचे प्रतिबिंब त्याच्या मनावर जसेच्या तसे उमटते. ज्यांची प्रतिभा तरल असते त्यांना सृष्टीतील विविध दृष्य , जीवनातील घटना अल्पावधीतच सुस्पष्ट रितीने ग्रहण करता येतात. त्या दृष्टीने ग्रहण किंवा धारण प्रतिभेचे प्राथमिक कार्य व आवश्यक अंग ठरते. या ग्रहण किंवा धारण शक्तीच्या आधारे प्रतिभावंत लेखक उत्कृष्ट लेखन करतो.

**२ स्मरण** — ज्याचे ग्रहण किंवा धारण उत्तम असते त्याचे स्मरणही उत्तम असते. लेखकाचे स्मरण उत्तम असेल तर पाहिलेले व अनूभवलेले पुन्हा त्याला शब्दबध्द करता येते. त्यामुळे ती कलाकृतीही सुंदर ठरेल.

**३ निवड** — लेखकाने घेतलेल्या अनुभवातील सर्वच बाबी साहित्यकृतीच्या निर्मितीस अनुकूल असतील असे नाही. आपण घेतलेल्या अनुभवातील आपल्या कथेस—कवितेतील आशयास योग्य अशा बाबी निवडून जुन्या अनुभवातून बाजूला काढणे हे प्रतिभेचे महत्वाचे अंग अथवा कार्य आहे. अनुभवांची योग्य व समर्पक निवड करणे व त्यानंतर विविण अनुभवांचे मिश्रण करणे ही निवडीनंतरची क्रिया होय.

**४ मूळ कल्पना** — अनुभवाची निवड व त्याचे संकलन करून जी साहित्यनिर्मिती केली जाते त्यासाठी मूळ कल्पना लेखकाला सूचावी लागते. ही नवी कल्पना सूचणे हे निर्मितीक्षम प्रतिभेचे महत्वपूर्ण कार्य व अंग आहे. एखादी व्यक्तिरेखा आणि प्रसंग यांतून ही नवी कल्पना सुचू शकते. नवनिर्मितीमागील कल्पना कवीला मूळातून स्फुरावी लागते.

**५ स्फूर्ती** — कलावंताच्या निर्मितीक्षणांची जी उत्कट स्थिती असते ती स्फूर्ती होय. लिहिल्याशिवाय रहावत नाही, अशी जी मनाची अवस्था होते तिला स्फूर्ती असे म्हणता येईलण प्रतिभेचा उत्कट विलास म्हणजे स्फूर्ती होय. हीच स्फूर्ती क्षणार्धात कवीचे अंतरंग प्रकाशमान करते. कवीच्या प्रतिभेला जागृत करण्याचं काम स्फूर्ती करते. तिचा स्वभाव मात्र लहरी आहे. कवीला तिच्या कृपेची वाट पहावी लागते. ती प्रयत्नाने साण्य होत नाही. सातत्य हा प्रतिभेचा गुणधर्म आहे, तर क्षणिकता हा स्फूर्तीचा गुण आहे. ही आकाशातील वीजेप्रमाणे क्षणकालच टिकते. अल्पकालत्व हा तिचा गुणधर्म आहे. प्रतिभेपेक्षा स्फूर्तीचे महत्व कमी आहे.

प्रतिभेहून तिला स्वतंत्र अस्तित्व नसते. म्हणून संस्कृत साहित्यज्ञांनी तिचा वेगळा उल्लेख केला नाही. तरी काव्यप्रक्रियेत तिला महत्वाचे स्थान आहे.

**६ उत्प्रेक्षा अथवा उत्प्रेक्षण** –  काव्यनिर्मितीप्रक्रियेतील महत्वाचे अंग म्हणजे कल्पनाशक्ती होय. कल्पनाशक्ती आणि उत्प्रेक्षा अथवा उत्प्रेक्षण या दोन वेगळया  शक्ती आहेत. उत्प्रेक्षा म्हणजे कल्पनांचा स्वैर विहार होय.  पूर्व संग्रहित घटनांची पुनर्निमिती म्हणजे उत्प्रेक्षण होय. कल्पनात्मक निर्मितीत मनाचा अविष्कार असतो. उत्प्रेक्षेमंळे रसिकांचे मनोरंजन होते , रसिकांना आनंद मिळतो. गोविंदाग्रजांची 'अरूण' ही कविता उत्प्रेक्षेचे उत्तम उदाहरण आहे. 'गॅलिव्हर्स ट्रॅव्हल' मधील अंगठयाएवढी माणसं , अरबी भाषेतील उडता गालीची, जादूचा दिवा, दिव्यातून प्रकटणारा जीन, 'तिळा तिळा दार उघड' म्हणताच उघडणारा दरवाजा, राक्षस, बोलणारा पक्षी ही सर्व उत्प्रेक्षेची  उदाहरणं आहे. चंद्रावरील डाग म्हणजे प्रणयिनी रजनी प्रियकर चंद्रावर विसावली आहे अशी कल्पना करणे म्हणजेच उत्प्रेक्षण होय. हीच वाचकांना लुभावणारी कल्पनात्मक नवनिर्मिती होय  कल्पनेला वास्तवाचे व औचित्याचे भान असते तर उत्प्रेक्षण स्वैर असते.

**भावनात्मकता** –  शास्त्रज्ञांच्या प्रतिभेवर बुद्धीचे व तर्काचे संस्कार झालेले असतात तर कवीच्या प्रतिभेवर भावनांचे संस्कार झालेले असतात उलट कवीच्या प्रतिभेवर भावनांचे प्रबळ संस्कार झालेले असतात. कवीचे मन राग, द्वेष, लोभ मद, मत्सर अशा दोषांचा विचार करते तसेच प्रेम, भक्ती, दया, क्षमा अशा उदात्त भावनांचाही विचार करते. कवी कल्पनेचया साहयाने कुठल्याही वस्तूच्या अंतरंगात प्रवेश करून तेथील सौंदर्याला शब्दरूप देतो. शास्त्रज्ञ आणि कवी यांची प्रतिभा एकच असली तरी त्यावरील संस्कार भिन्न असतात व त्यांच जगााकडे पाहण्याचा दृष्टिकोणही वेगळा असतो. भावनात्मकता हा कवीच्सा प्रतिभेचा अलेकार आहे. काव्यनिर्मितीचे प्रमुख कारण प्रतिभा हे असले तरी भावनात्मकता असल्याशिवाय काव्यलेखन होवू  शकत नाही.  शास्त्रीय संशोधन हे बौद्धिक अविष्कार असला तरी काव्यलेखन हे भावनात्मक अविष्कार आहे. ' उत्स्फूर्त भावनांचा सहज उद्रेक म्हणजे कविता' असे वर्डस्वर्थ म्हणतो. म्हणजेच त्याने भावनात्मकतेला महत्वाचे स्थान दिले आहे.

कल्पनाशक्ती आणि सहानुभाव : – कवीजवळ प्रतिभा ही निसर्गदत्त शक्तीअसते. म्हणजेच त्याच्याकडे उत्कट कल्पनाशक्ती असते. कल्पनाशक्तीच्या जोरावर कवी अनेक व्यक्तींच्या व घटनांच्या अंतरंगात प्रवेश करतो. हाच कवीचा सहानुभाव होय. समाजाची सुखदु:खे ही जेंव्हा कवीची सुखदु:खे होतात तेंव्हाच तो उत्तम

कविता लिहू शकतो. 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न', 'मजुरावर उपासमारीची पाळी' या सामाजिक कविता केशवसुतांच्या लेखणीतून अवतरल्या कारण अस्पृश्य मुलगाा आणि मजूर यांच्या भवनांशी आणि सुखदु:खाशी कवी एकरूप झाले. हाच कवीचा श्रेष्ठ सहानुभाव होय. सुगरण पक्षिणीने झाडाला केवळ चोचीने बांधलेले सुंदर घरटे पाहून बहिणाबाई दोन हात दहा बोटे असणा–या माणसाला सतत उद्योगी रहाण्याचा सल्ला देतात.

## काव्यनिर्मितीसाठी आवश्यक असणारी काव्यकारणे

१ व्युत्पत्ती (बहुश्रुतता) :– संस्कृत अभ्यासकांनी काव्यनिर्मितीच्या कार्यात प्रतिभेच्या खालोखाल व्युत्पत्ती म्हणजेच व्युत्पन्ता आणि अभ्यास म्हणजेच बहुश्रुतता या दोन गुणांना महत्व दिले आहे. दण्डी व्यत्पत्तीला 'श्रुत' म्हणतो , राजशेखर तिला 'निपुणता' तर राजशेखर तिला 'बहुश्रुतता' म्हणतो. आपल्या काळात उपलब्ध असलेल्या सर्व कलांचे, साहित्याचे,शास्त्रांचे तसेच मानवी जीवन व्यवहारांचे , ज्ञान असणे म्हणजेच बहुश्रुतता होय. उदा. लेखकाला कोळयांच्या जीवनावर कादंबरी लिहायची असेल तर त्याला त्यांची जीवनपद्धती, चालीरिती, विवाहविधी, उपासनापद्धती, सामुदायिक सण–उत्सवपद्धती, त्यांची भाषा, समुद्राला येणारी भरती ओहोटी यांची माहिती असणे आवश्यक आहे. तर ते साहित्य सत्याच्या जवळ जाते. कादंबरीत जीवनाचे विशाल दर्शन घडवायचे असल्याने लेखकाला व्युत्पन्नतेचे नितांत गरज असते. ऐतिहासिक कादंबरी लिहिण्यासाठी तत्कालीन पेहेराव, ययास्त्रांची नावे, तत्कालीन युद्धनीती, भौगोलिक प्रदेश– वातावरण, सैन्यातील अणिकारी, घोडे, हत्ती, यांची माहिती, दरबारी वातावरणातील रीतिरिवाज,महालातील वर्तन, किल्ल्यांची रचना, तत्कालीन समाजाचे सण उत्सव यांची माहिती असावी लागते. यासाठी व्युत्पन्नता अथवा बहुश्रुततेची गरज असते.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी मात्र 'विद्वत्व आणि कवित्व' या आपल्या लेखात 'कवित्वास विद्वत्तेची अगदी गरज नाही' असे मत मांडले आहे. प्लेटोने आपल्या आदर्शराज्याच्या कल्पनेत कवींना प्रवेश नाकारला आहे. काव्यसृष्टी काल्पनिक, असंभाव, असत्य आणि विपर्यस्त गोष्टींवर उभी असते असे मेकॉले, विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि प्लेटो यांना वाटते. जसेशास्त्र वाढत जाईल तसे काव्य नष्ट होईल असे त्यांना वाटते. मात्र बदलत्या काळाने शास्त्रे जेवढे वाढली तितकीच कला समृद्ध झाली हे सिद्ध केले आहे.आज माणसाने विज्ञान आणि शास्त्रात विस्मयकारक प्रगती केली आहे. पण शास्त्राच्या प्रगतीबरोबर काव्य नष्ट न होता उलट उत्तमोत्तम साहित्यनिर्मिती होत आहे. साहीत्य आणि शास्त्र हे परस्पर विरोधी नाही तर परस्परपूरक

आहेत. विश्वाचे विशाल यप आणि त्यातील विविधता दाखविणे हे शास्त्रज्ञ व साहित्यिक या दोघांचेही कार्य होय. मात्र त्याकडे पाहण्याचा दोघांचाही दृष्टिकोण वेगवेगळा आहे. हा वेगळेपणा म्हणजे विरोध नव्हे. शास्त्रीय दृष्टिकोण जिथे थांबतो तेथून साहित्यिक दृष्टिकोण सुरू होतो. यासाठी साहित्यिकाजवळ बहुश्रुतता असणे आवश्यक असते.

२ व्युत्पत्तीच्या मर्यादा :— साहित्यिकाजवळ बहुश्रुतता अथवा व्युत्पत्ती हे दोन गुण असणे आवश्यक असले तरी काव्यनिर्मितीमधील व्यत्पन्नतेचे स्थान प्रतिभा आणि भावनात्मकता यांच्या मानाने दुय्यम असते. विद्वत्ता नसूनही प्रतिभेच्या जोरावर काही काव्ये ‘अक्षर’ झाली आहेत.बहिणाबाई चौधरी या निरक्षर स्त्रीने म्हटलेली गाणी आज महाविद्यालयात शिकविली जातात. तर संत नामदेवांच्या घरी दासी असलेल्या अशिक्षित जनाबाईने लिहिलेल्या अभंगाने गेली अनेक शतके मराठी मनावर राज्य केले आहे. काव्यनिर्मितीसाठी बहुश्रुतता गरजेची आहे असे म्हटले जाते पण ते मर्यादित अर्थाने होय.

३ अभ्यास :— संस्कृत साहित्यज्ञांनी सांगितलेले तिसरे काव्यकारण म्हणजे अभ्यास होय. अभ्यासात मुख्यत्वे काव्याच्या बाहयांगाचा विचार येतो. त्या त्या साहित्यप्रकारांची तंत्रे सांभाळण्यासाठी अभ्यासाची गरज असते. विख्यात लेखकांच्या श्रेष्ठ कलाकृतींच्या तंत्राचा अभ्यास करून हे तंत्रा नवोदित लेखकाला आत्मसात करणे सहज शक्य आहे. त्यामुळे साहित्यकृतीचे बाहयांग निर्दोष होण्यास मदत होते. कलापूर्ण मांडणी, रसाळ वृत्तयोजना, अलेकार, उचित शब्दप्रयोग या बाबतीतील कौशल्य लेखक फक्त अभ्यासानेच प्राप्त करू शकतो. साहित्यकृतीत काव्यगुण आणणे आणि काव्यदोष टाळणे यासाठी अभ्यासाची आवश्यकता असते.

**साहाय्यक कारणे :—**

१ शारीरिक स्वास्थ्य :— काव्य सूचणे हे प्रतिभेचे कार्य असले तरी ते लिहून काढणे हे व्यावहारिक काम आहे. यासाठी कवीला निवांतपणा किंवा एकांत मिळणे आवश्यक असते. काव्यरचना करण्यासाठी साहित्यिकाचे आरोग्य चांगले असणे आवश्यक असते. साहित्यिक संसारातील अनंत अडचणींनी व्यापला असेल, शारीरिक व्याधींनी ग्रस्त असेल तर तो साहित्य निर्माण करू शकणार नाही. स्वास्थ्य चांगले असले की ध्येय, विचारांचे चिंतन होते. विषयाच्या अनुषंगाने अनेक कल्पना सुचतात. स्फूर्तीचे प्रसंग वारंवार येतात. यासाठी साहित्यिकास शारीरिक स्वास्थ्य आवश्यक असते.

२ मानसिक स्वास्थ्य :– मानसिक स्वस्थ्यासाठी राजशेखर याने 'अनिर्वेद' हा शब्द सांगितला आहे. साहित्यिकासजवळ केवळ शारीरिक स्वास्थ्य किंवा एकांत असून उपयोगाचा नाही तर त्याचे मानसिक स्वास्थ्यही उत्तम असणे आवश्यक असते. कुटुंबात जर भांडणे असतील, जवळच्या नातेवाईकाचा मृत्यू झाला असेल, घरात भाऊबंदकीची भांडणे संरू असेल तर साहित्यिक साहित्यनिर्मिती करू शकणार नाही पाश्चात्य साहित्यिक टेनिसन याच्या मित्राचा मृत्यू झाल्यानंतर काही काळ त्याची काव्यरचना थांबली होती. म्हणून कवीला काव्यरचनेसाठी मानसिक स्वास्थ्याची आवश्यकता असते. काव्यरचनेचा संबंण मनाशी आहे. प्रतिभाशक्ती ही कविमनाचा गुणधर्म आहे. मन स्वस्थ असेल तर कवीला काव्याचे नवनवे विषय सुचतील. त्या विषयाचा अविष्कार रम्य होईल.

३ स्मृतिदृढता :– साहित्यिकाचे मन जसे स्थिर , शांत असणे आवश्यक आहे तोच त्याची स्मरणशक्ती पक्की अथवा दृढ असणे आवश्यक आहे. साहित्यिकाचे मन जर चंचल व अस्थिर असेल तर त्याला भूतकाळातील घटनांचे स्मरण राहणार नाही. कवीचे भूतकालीन आणि वर्तमानकालीन घटनांचे, व्यक्तींचे, प्रश्नांचे आणि परिस्थितीचे स्मरण जितके पक्के असेल तितके त्याचे संकलन प्रभावी व परिणामकारक होते. त्यातून उत्तम साहित्यकृती निर्माण होते. ज्यांचे ग्रहण म्हणजेच आकलन स्पष्ट आणि ठळक असते त्याचेच स्मरण पक्के असते पक्के, घट्ट अथवा दृढ स्मरण हाच काव्यनिर्मितीचा पाया असतो.

४ परिस्थिती :– समकालीन राजकीय, सामाजिक सांस्कृतिक, धार्मिक परिस्थितीचा साहित्यिकाच्या मनावर पडलेला प्रभाव बरेचदा त्याच्या साहित्यकृतीतून प्रतिबिंबित होत असतो उदा. ऋग्वेदकालीन काव्यावर नैसर्गिक घडामोडींचा तसे, वादळे, अतिवृष्टी, प्रखर सूर्य, प्रसन्न प्रभात याची प्रतिबिंबे दिसतात. तर स्वातंत्रपूर्वकालातील साहित्यात पारतंत्र्याचा धिक्कार व स्वातंत्र्याचा जयजयकार दिसून येतो.मराठी मुलुखातील स्वातंत्र्य प्रेरणेने शाहिरी काव्य बहरले. १९६२ सालच्या चीन भारत युद्धाच्या कालखंडात देशभर चीनचा धिक्कार करण्यात आला देशभक्तीपर गीते लिहिली–गायिली गेली. ब्रिटिश कालात जशा स्वातंत्र्यउर्मी साहीत्यातून जागविल्या गेल्या तसेच सामाजिक भेदाभ्दोचा देखिल निषेध केल्या गेला केशवसुतांची 'नवा शिपाई', 'तुतारी', अंत्यजाच्या मुलाचा पहीला प्रश्न', अशा कविता समाज जागृतीपर कविता त्यांनी लिहिल्या. अशा प्रकारे त्या त्या काळची परिस्थिती कळत नकळतपणे कवीच्या मनावर संस्कार करीत असते. प्रभाव पाडीत असते. मग त्या परिस्थितीचे प्रतिबिंब काव्यात उमटते. कवी, नाटककार, कथाकार कितीही प्रभावशाली

असला तरी तो या परिस्थितीच्या प्रभावातून सुटू शकत नाही. त्यामुळे परिस्थिती हे काव्याच्या स्वरूपास विशिष्ट वळण मिळण्याचे कारण आहे.

५ भक्ती :– मन एकाग्र करणे, एकाग्र मनाने ईश्वर चिंतन करणे, त्याचे नामस्मरण करणे या मानसिक अवस्था मन उदात्त राहण्यासाठी उपकारक ठरतात. ईश्वरचिंतनात एकाग्रहोण्याची सवय असलेले कविमन जीवनातील सुंदर व चांगल्या गोष्टींचे उत्तम चितंन करू शकते. तो त्या गोष्टींचा सर्वंकष विचार करू शकेल. विशिष्ट विषयावर कवीचे मन सूक्ष्मपणे चिंतन करत राहिले पाहिजे. तरच त्या विषयाचा तो उत्तम विस्तार करू शकेल. भक्तीमध्ये समर्पण असते. हेच समर्पण विषय चिंतनासाठी महत्वपूर्ण ठरते.

थोडक्यात, शारीरिक स्वास्थ्य, मानसिक स्वास्थ्य, स्मृतिदृढता, परिस्थिती आणि भक्ती ही काव्यनिर्मितीसाठी आवश्यक असणारी काव्यकारणे साहाय्यक होत.

# मराठी साहित्य

## बी.ए.भाग –२/ सत्र चवथे

## काव्यशास्त्र परिचय

### प्रकरण दुसरे –शब्दशक्ती आणि अर्थविचार

शब्दांच्या अभिधा, लक्षणा आणि व्यंजना या तीन शक्ती मानल्या गेल्या आहेत. या तीन शक्तींचे तीन वाच्यार्थ, लक्ष्यार्थ आणि व्यंग्यार्थ असे तीन अर्थ मानल्या गेले आहेत

• **अभिधा – वाच्यार्थ :–** शब्दांची सर्वप्रथम आणि प्रमुख शक्ती म्हणजे अभिधा शक्ती होय. कोणत्याही शब्दांचा सरळ आणि त्याच्या उच्चारासरशी बोलणा–याच्या आणि ऐकणा–याच्या मनात येणारा जो अर्थ तोच मुख्यार्थ होय. यालाच वाच्यार्थ असे म्हणतात. शब्दांना ठराविक अर्थ कोणी दिले याचे उत्तर देणे ककठीण आहे. एक भाषिक मानवसमूह शेकडो वर्षांच्या कालखंडात हे अर्थ निश्चित करतो. मग ते शब्द पुन्हा पुन्हा त्याच अर्थाने वापरले जातात आणि समूहात त्याचे अर्थ पक्के होतात.

१ संकेत– संकेतितार्थ : अभिधा शक्तीने शब्दांला प्राप्त होणा–या मुख्यार्थाला अगर वाच्यार्थाला संकेतितार्थ असेही म्हणतात. संकेत म्हणजे ठराव. प्राचीन काळापासून समाजाने मान्यता दिलेले शब्द व अर्थ असतात. हे संकेत कोणी केले हे सहजासहजी कळणे शक्य नाही. संकेतांचा उगम न कळल्याने भाषा आणि त्यातील शब्द परमेश्वराने निर्माण केले आहेत अशी प्रारंभी समजूत होती. मात्र हे संकेत माणसांनेच रूढ केले आहेत. माणसामाणसांमधील व्यवहार सुकर होण्यासाठी भाषेचा उपयोग होतो. समाजाच्या मान्यतेला अगर एकमतालाच संकेत असे म्हणतात. समाजाचे एकमत हीच या शब्दांची शक्ती असते. तिलाच 'अभिधा' असे म्हणतात. विशिष्ट शब्दाचा अर्थ विशिष्टच करायचा हा संकेत समाजाला माहित नसेल तर शब्दांचा अर्थच कळणार नाही. उदा. नदी हा शब्द उच्चारताच वाहणा–या पाण्याचा प्रवाह आपल्या नजरेपुढे येतो आणि तो शब्द उच्चारतातच त्याचा आशय लक्षात येतो. 'डोंगर' हा शब्द उच्चारताच 'डोंगर' ही वस्तू नजरेपुढे येते. हा संकेत कसा ठरला हे निश्चितपणे सांगता येत नाही. . 'डोंगर' हा उच्चार, हा शब्द उच्चारताच श्रोत्यांच्या मनावर होणारा बोध, व 'डोंगर' या शब्दाने वाच्य वस्तू या तीन गोष्टी वेगवेगळया असूनही त्या तीन गोष्टी एकरूप वाटतात. ही एकरूपता म्हणजेच संकेत होय.

२ संकेताची अतात्त्विकता : समाजातील संकेत नियमबद्ध किंवा साचेबद्ध नाही. या संकेतांना कारण देता येत नाही किंवा त्यांची काही उपपत्ती सांगता येत नाही. म्हणजेच संकेतांचे स्वरूप अतात्त्विक आहे. 'हत्ती' या शब्दाचा अर्थ खंगासारख्या चार पायांचा, विशाल देहाचा, सुपाएवढया कानांचा, सोंडेचा असणारा प्राणी घ्यायचा की एखादा पक्षी किंवा फूल घ्यायचा ? या प्रश्नांना कारणे देता येत नाही. म्हणजेच संकेत कसा ठरतो हे शोध घेवूनही समजण्यासारखे नाही. थोडक्यात संकेताचे स्वरूप लहरी, स्वैर आणि अतात्त्विक असते हकच समजणे योग्य होईल.

३ संकेत व्यक्तिवाचक की जातिवाचक : एखादा शब्द उच्चारल्याबरोबर एखादी व्यक्ती किंवा वस्तू डोळयापुढे येते की त्याची जाती ? असा प्रश्न उद्‌भवतो. पुस्तक किंवा माणूस म्हटल्याबरोबर ठराविक पुस्तक किंवा ठराविक माणूस नजरेपुढे येतो की पुस्तकांचा अथवा माणसांचा समूह डोळयापुढे येतो ? असा हा प्रश्न आहे. पुस्तक म्हटल्याबरोबर त्याची जाडी, आकार, पृष्ठांची एकत्रित बांधणी, मुखपृष्ठ इत्यादी त्याचे गुणविशेष लक्षात येतात. जातिकल्पना म्हणजे गुणांचा समूह होय. गुण हेआकारविशिष्ट असतात. अशी आकारयुक्त वस्तू म्हणजे व्यक्ती होय. म्हणून संकेत हे जातिवाचक नसून व्यक्तिवाचक होय. ।

काही अभ्यासकांच्या मते शब्दाने जातीचा बोध होतो. तर काही अभ्यासकांच्या मते जातिविशिष्ट व्यक्तीचा बोध होतो उदा. 'घोडा' या शब्दाने घोडयाचा बोध होतो. पण त्याचवेळी घोडयाचे विशिष्ट गुणधर्मही जसे, लांब व केसाळ मान, झुबकेदार शेपूट, उमदा, चार पायांचा प्राणी असे गुणधर्मही येतात. म्हणून एखाद्या शब्दाच्या उच्चाराबरोबर जातिकल्पनेसहित व्यक्ती डोळयापुढे येते. शब्दांचा वाच्यार्थ–मुख्यार्थ–संकेतितार्थ हा जातिविशिष्ट अशी व्यक्ती असाच अर्थ घेणे वास्तवाला धरून आहे. असा अर्थ व्क्त करणारी शक्ती म्हणजे. अभिधा होय.

४ अभिधेचे प्रकार : अभिधेचे तीन प्रकार पडतात.

अ ) योग : 'योग' या शब्दाचा अर्थ व्युत्पत्ती असा आहे. शब्दाचा अर्थ जेंव्हा व्युत्पत्तीने लागतो तेंव्हा त्या शब्दशक्तीला योगशक्ती असे म्हणतात. त्या शब्दांना 'यौगिक' म्हणतात. हे शब्द घटक आणि अवयवापासून बनलेले असताता व्युत्पत्तीने हे घटक आणि अवयवापासून वेगळे काढता येतात.. एकत्रितपणेच

त्यांचा अर्थ तयार होतो. उदा. वर्तमानपत्र, देवघर, पुस्तकालय, गृहकलह संपादकीय, भारतीय या दोन्हीच्या एकत्र अर्थाने शब्दाचा अर्थ तयार होतो.

ब ) रूढी : शब्दांमधील ही शक्ती रूढीने नियंत्रित केलेली असते. हे शब्दांचे घटक आणि अवयवा पाडून व्युत्पत्तीने त्या शब्दांचा अर्थ लावता येत नाही. याला रूढीने अर्थ लावण्यात येतो. शब्दांच्या अर्थाला कारणमीमांसा देता येत नाही. त्या शब्दांचा अर्थ पूर्वापार चालत आलेला असतो. उदा. मंडप, गृह, तरू, अश्व, डोळा या शब्दांना रूढ शब्द म्हणतात.

३ योगरूढ : काही शब्दांमध्ये रूढी आणि व्युत्पत्ती या दोन्हींचे साहाय्य घ्यावे लागते. काही हे शब्दात घटक आणि अवयवापासून असतात मात्र त्या शब्दांचा अर्थ व्युत्पत्तीने लावता येत नाही तर रूढीने लावण्यात येतो घटक आणि अवयव विचारात घेऊन त्या शब्दांचा अर्थ लागत नाही. उदा. पंकज, खग इत्यादी. इथे पंकज = पंक +ज = चिखलात जन्म घेतलेले बेडूक, चिखलातील कृमी, लव्हाळे असे विविण अर्थ ध्यावे लागतील. पण रूढीने पंकज म्हणजे कमळ असा अर्थ निश्चित केला आहे. खग = ख+ग आकाशात गमन करणारी तो , असा अर्थ व्युत्पत्तीने लावला तर पक्षी, , विमान, सूर्य, चंद्र, तारे असे अनेक अर्थ घ्यावे लागतील. पण रूढ अर्थाने पक्षी असा अर्थ निश्चित केला आहे. असे जे शब्द योग आणि रूढीं दोन्हीच्या माध्यामातून निश्चित केले जातात त्यांना योगरूढ शब्द असे म्हणतात.

- **लक्षणा आणि लक्ष्यार्थ :** जेंव्हा बोलणारा आणि ऐकणारा वाच्यार्थापेक्षा दुसराच अर्थ घेतो तो 'लक्ष्यार्थ' होय. वक्त्याच्या आणि श्रोत्याच्या मनात वाच्यार्थ किंवा मुख्यार्थ नसतात तर दुसरेच अर्थ असतात यांनाच ' लक्ष्यार्थ' असे म्हणतात. असा अर्थ व्यक्त करण्याची जी शब्दांची शक्ती तिला 'लक्षणा' असे म्हणतात उदा. ' अजमन नळ कसा आला नाही ?', 'किंवा अजून बस कशी आली नाही ?' या वाक्यांच्या वाच्यार्थाला महत्व नाही कारण 'नळ' कधीच कुठे येत जात नाही तर नळाला पाणी येते अगर जाते असा त्याचा अर्थ आहे. किंवा 'बस' स्वत:हून येत नाही तिला ड्रायव्हर आणतो. 'माझ्यादारावरून हत्ती गेला' याचा अर्थ दारापुढील रस्त्यावरून असा होतो. 'मी खांडेकर वाचला' याचा अर्थ मी त्यांच साहित्य वाचलं असा होतो. 'अरे दिनू! आणखी एक पेला घे !' इथे पेला या शब्दाचा वाच्यार्थ न घेता त्यातील सरबत असा अर्थ घेतल्या जातो. या शक्तीलाच कोणी 'उपचार' तर कोणी 'भक्ती' असे म्हणतात.

**• लक्षणेस आवश्यक बाबी :** लक्ष्यार्थ हा मुख्य नव्हे. कधीकधी शब्दांचे मुख्यार्थ बाजूला ठेवून गौण अर्थ घ्यावे लागतात. तेच 'लक्ष्यार्थ' होय. 'लक्ष्यार्थ' घेण्यासाठी तीन बाबी आवश्यक असतात. अ) मुख्यार्थबाध, ब) लक्ष्यार्थाचा मुख्यार्थाशी संबंध आणि क) प्रयोजन किंवा रूढी

अ) मुख्यार्थबाध : लक्षणेस आवश्यक बाब असणारी पहिली बाब म्हणजे शब्दाचा मूळ अर्थ न लागणे म्हणजे मुख्यार्थबाध होय. उदा. ' आमच्या दारावरून मंत्रयांची मिरवणूक गेली', ' तू शुद्ध राक्षस आहेस', 'तू आणखी एक कप घे', 'मी मर्ढेकर वाचला' या वाक्यातील दार, राक्षस, कप, मर्ढेकर या शब्दात मुख्यार्थबाध झाला आहे. असा मुख्यार्थबाध झाल्याशिवाय लक्षणेकडे वळता येत नाही. इथे दारावरून म्हणजे रस्त्यावरून , राक्षस म्हणजे क्रूर, कप म्हणजे चहा, आणि मर्ढेकर म्हणजे त्यांचे लक्षार्थ आहेत. .

ब) लक्ष्यार्थाचा मुख्यार्थाशी संबंध : लक्ष्यार्थाचा मुख्यार्थाशी संबंण असणे आवश्यक असते. 'मी मर्ढेकर वाचला' या वाक्यातील मर्ढेकर म्हणजे त्यांची कविता होय इथे कतृकर्म संबंध आहे. मुख्यार्थाचा लक्ष्यार्थाशी काहीतरी संबंध असतो. या संबंधालाच 'तद्योग' असे म्हणतात. ' आमच्या दारावरून मंत्रयांची मिरवणूक गेली' इथे दार म्हणजे रस्ता होय. इथे निकटत्वाचा संबंध व्यक्त करण्यात आला आहे. अशा शब्दप्रयोगात काव्य असते. या दृष्टिने लक्षणा काव्या अनुकूल असते.

क) प्रयोजन किंवा रूढी : अभिधा सोडून आपण लक्षणा वापरतो त्यामागे काही कारण अथवा हेतू असतो. ' दारावरून उंट गेला' इथे दारावरून म्हणजे रस्त्यावरून. हा लक्ष्यार्थ होय. बोलणा–याच्या मनातील अतिनिकटत्वाचा संबंध ऐकणा–याला कळतो. ' तू शुद्ध राक्षस आहेस' यामागचे कारण असे की दोघांचीही कृती आणि क्रूरता सारखीच आहे. मुख्यार्थ उपयोगी न पडणारी आणि शब्दाचा गौण अर्थ प्रकट करणारी ही लक्षणा वापरली जाते. यामागे काहीतरी प्रयोजन अथवा हेतू असतो.

कधीकधी बोलणा–याचा हेतू रूढीमुळे लुप्त झालेला असतो. मुळात सुरवातीला या शब्दप्रयोगाच्या वापरामागे असलेले प्रयोजन हळूहळू नाहिसे होवून लक्ष्यार्थ हाच मुख्यार्थ झाला. 'कुशल' या शब्दाचा आजचा अर्थ तरबेज असा होतो. मात्र पुर्वी दर्भ किंवा कुश नावाचे वैशिष्टयपूर्ण गवत तोडणारा तो कुशल पुढे प्रयोजन विसरले गेले 'कुशल' म्हणजेप्रवीण हाच अर्थ रूढ झाला. मुळात लक्ष्यार्थ हाच वाच्यार्थ ही

झाला. ही निरूढा लक्षणा होय. निरूढा लक्षणा आरंभी प्रयोजनवतीच असते. कुशल या शब्दाचा मूळ अर्थच आपण विसरून गेलो आहे.

- **लक्षणेचे प्रकार :**

१ निरूढा लक्षणा : लक्षणेच्या योजनेत मुख्यार्थबाध, तद्योग प्रयोजनासह रूढी हेही कारण असते. जेंव्हा तस बोलण्याची रूढी असते., तेंव्हा ती निरूढा लक्षणा होते. 'पानिपतावर हजार बांगडी फुटली' या वाक्यात बांगडी फुटणे म्हणजे वैधव्य होय. याचाच अर्थ असा की पानिपतच्या युद्धात हजार सैनिक मरण पावले. हा अर्थ लक्षणेने कळतो. हा अर्थ रूढीवर आधारित आहे. म्हणून ही निरूढा लक्षणा होय. ही लक्षणा तशी क्षीण झाली आहे. या लक्षणेचा वापर कमी झाला आहे.

२ प्रयोजनवती लक्षणा : वाच्यार्थाला बाजूला सारून त्याच्याशी संलग्न असलेला गौण अर्थ स्वीकारायला काहीतरी प्रयोजन असावे लागते. असे प्रयोजन असलेली लक्षणा म्हणजेच प्रयोजनवती लक्षणा होय. या लक्षणेचे १) गौणी लक्षणा आणि २) शुद्धा लक्षणा असे दोन प्रकार पडतात.

१) गौणी लक्षणा : दोन वस्तूत असलेल्या गुणांच्या साम्यामुळे गौणी लक्षणा होते. उदा. 'तासगावची सिडलेस द्राक्षे म्हणजे नुसता मध आहे' इथे द्राक्षे आणि मध या दोन्हीमध्ये गोडी हा समान गुण आहे. म्हणून ही गौणी लक्षणा होय. 'वामन म्हणजे खरोखर गाढव आहे.'इथे वामन आणि गाढव यात 'निर्बुद्धपणा' हा समान गुण आहे. इथे गोडी आणि निर्बुद्धपणाचाअधिक प्रभावीपणे व्यक्त करणे हे प्रयोजन आहे. हीचे • गौणी सारोपा लक्षणा आणि • गौणी साध्यवसाना लक्षणा असे दोन प्रकार पडतात.

- **गौणी सारोपा लक्षणा :** गौणी सारोपा लक्षणेत दोन वस्तूंपैकी एकीचा दुसरीवर आरोप केलेला असतो. 'लावण्यवतीचे मुख म्हणजे चंद्रबिंबच!' यात मुखावर चंद्रबिंबाचा अध्यारोप केलेला आहे. येथे मुख आणि चंद्र यांच्यात सौंदर्य हा समान गुण आहे. 'रत्नागिरीचा हापूस आंबा म्हणजे नुसते अमृत आहे' यामध्ये आंब्यावर अमृताचा अध्यारोप केला आहे. यांच्यात मधुरता हा समान गुण आहे. ही गौणी सारूपाची उदाहरणे सांगता येतील.

• **गौणी साध्यवसाना लक्षणा :** गौणी साध्यवसाना लक्षणेच्या या प्रकारात ज्यांच्यावर गुणाचा आरोप करावयाचा त्याचे अध्यावसान होते. म्हणजे ते गाळले जाते. या लक्षणेचे अतिशयोक्ती अलेकाराशी साम्य आहे. उदा. 'तासगावची सिडलेस द्राक्षे म्हणजे नुसता मध आहे' इथे द्राक्षे आणि मध या दोन्हीमध्ये गोडी हा समान गुण आहे. जेंव्हा द्राक्षांना उद्देशून पण त्याचा उल्लेख न करता ' नुसता मध आहे !' असे आपण म्हणू तेंव्हा तिला गौणी साध्यवसाना लक्षणा असे म्हणतात.

**२) शुद्धा लक्षणा :** शुद्धा लक्षणेत वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ यांचे संबंध साधर्म्यावा आधारित नसून कार्यकारणभावावर असते. ' आमच्या दारावरून मंत्र्यांची मिरवणूक गेली' इथे दारावरून म्हणजे दाराजवळील म्हणजे रस्त्यावरून असा अभिप्रेत आहे. इथे वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ यांच्यात जन्य—जनक संबंध आहे. या लक्षणेचे अ) सारोपा आ) साध्यवसाना इ) उपादान किंवा अजहल्लक्षणा ई) लक्षणलक्षणा किंवा जहल्लक्षणा असे चार प्रकार पडतात.

**अ) शुद्धा सारोपा :** शुद्धा सारोपा लक्षणेत वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ यांचे संबंध कार्यकारणभावावर आधारित असतात. हा प्रकार गौणी लक्षणेप्रमाणेच आहे. 'च्यवनप्राश म्हणजे साक्षत बलच!' या लक्षणेतील संबंध कार्यकारणभावावर आधारित आहेत. च्यवनप्राश हे बल निर्मितीचे कारण आहे. च्यवनप्राश या वस्तूवर बलनिर्मितीचा आरोप केला आहे.

**आ) शुद्धा साध्यवसाना :** कधीकधी ज्याच्यावर आरेप करावयाचा असतोत्याचा उल्लेख न करता केवळ परिणामाचाच विचार केलेला असतो.एखाद्या दारूबाज माणसाला उद्देशून आपण 'तू साक्षात रोगालाच आमंत्राण देत आहेस' असे म्हटल्यास इथे मद्यपानाचा परिणाम सांगणे होय. दारू पिण्याचे अथवा मद्यपानाचे इथे अध्यावसन झाले आहे म्हण्जेच दारू पिणे अथवा मद्यपान हा उल्लेख गाळून टाकलेला आहे. ही गौणी साध्यवसाना लक्षणा होय.

**इ) शुद्धा उपादान किंवा अजहल्लक्षणा :** शुद्धा उपादान लक्षणेत शब्दाचा मुख्यार्थ हाच लक्ष्यार्थामध्येच समाविष्ट होतो. तो पुर्णपणे नाहीसा होत नाही तेंव्हा उपादान लक्षणा होते. 'पानपतावर सव्वा लाख बांगडी फुटली' यातील मुख्यार्थ 'वैधव्य येणे' या लक्ष्यार्थासोबत येतो. म्हणून ही शुद्धा उपादान लक्षणा होय. शुद्धा

उपादान लक्षणेत शब्द आपला वाच्यार्थ न सोडता (अजहत्) दुसरा अर्थ व्यक्त करण्याचे कार्य करतो म्हणून तिला अजहल्लक्षणा असेही म्हणतात.

**ई) लक्षणलक्षणा किंवा जहल्लक्षणा :** काही ठिकाणी शब्दाचा लक्ष्यार्थच घ्यावा लागतो. तिथे वाच्यार्थ घेताच येत नाही. ‘माझ्या ग दारावरनं । कोण्या राजाचा हत्ती गेला. ।’ या ओळीतील दार या शब्दाचा वाच्यार्थ घेताच येत नाही. दार म्हणजे ‘दाराजवळचा रस्ता’ असा लक्ष्यार्थ घेतला तर बोलणा–याच्या मनातील अतिनिकटत्वाचा अर्थ व्यक्त होतो. लक्षणलक्षणेत शब्द आपला वाच्यार्थ सोडून (जहत्) दुसरा अर्थ स्वीकारतो म्हणमन तिला ‘जहल्लक्षणा’ असेही म्हटले जाते.

**३ लक्षणेतील काव्य :** लक्षणेत काव्याचा बराच भाग असतो. उदा. ‘रस्ते फुलून गेले होते.’, ‘रेशमाची कळी उमलली होती’, ‘पारावर गावक–यांचा हंशा पिकला होता.’, ‘आनंदीच्या नेत्रातून गंगा यमुना वाहत होत्या’, ‘सारिकाचा चेहरा म्हणजे पौर्णिमेचा चंद्रच !’, ‘उत्तरप्रदेशात सायकलने हत्तीचा पराभव केला’, ‘पानिपतवर दोन मोती गळाले’. अशा पद्धतीचे काव्य लक्षणेत भरपूर प्रमाणात दिसून येते. नव्या चेह–यांना संधी, आव्हान संपुष्टात, सभा जिंकली अशा अनेक वाक्प्रयोगातून लक्षणेचे साम्राज्य दिसून येते. लक्षणेतील काव्य हे बहुधा उपमेच्या स्वरात दिसून येते. लक्षधेमधील काव्य तसे कमी महत्वाचे असते, गौण असते. लक्षणेतील काव्य विषयातील असत नाही. विषयातील काव्य हे अधिक उत्कट असते. हे काव्य अर्थातच व्यंजनाशक्तीच्या आधाराने व्यक्त होते.

- **व्यंजना आणि व्यंग्यार्थ :** शब्दांच्या तीन शक्तींपैकी तिसरी शक्ती व्यंजना होय.

**१) व्यंजना – स्वरूप व विशेष :** काव्यत शब्दार्थांना वाच्यार्थाहून वेगळाच अर्थ लाभत असतो. कविव्यापारातून निर्माण झालेल्या अर्थावर काव्यसौंदर्य उभे असते. हाच शब्दांचा व्यंजनाव्यापार होय. मुख्यार्थाला बाध न होता शब्दोच्चाराबरोबर रसिकांच्या अंतरंगात वाच्यार्थाहून वेगळे असे रमणीय अर्थ निर्माण होतात त्यांनाच व्यंग्यार्थ किंवा ध्वन्यर्थ असे म्हणतात. शब्दांच्या व्यंजनाव्यापाराने हे कार्य घडते. मुख्यार्थापेक्षा अधिक अर्थ सांगणा–या या शक्तीला व्यंजना असे म्हणतात. व्यंजना म्हणजे सूचना. व्यंग्यार्थ हा शब्दांनी वाच्य नसतो पण शब्दांनी सूचित केलेला असतो.

**'सूर्य अस्तास गेला'** या वाक्यात मुख्यार्थ बोध आहे. पण या वाक्याचे संदर्भाने वेगवेगळे अर्थ होतात. 'सूर्य अस्तास गेला' या वाक्यातून मंदिरातील पुजा—याला 'आता मंदिरात दिवा लावण्याची वेळ झाला', असे वाटते. तर नववधूस ' आता पती घरी येण्याची वेळ झाली' अशी सूचना मिळते. चोराला या वाक्यातून ' आता चोरी करण्याच्या पूर्वतयारीला लागले पाहिजे' असे वाटते. शेतक—याला ' आता घरी जावून विश्रांती घ्यावी' असे वाटते. प्रेयसील ' आता प्रियकरास विशिष्ट ठिकाणी भेटण्याची वेळ झाली ' अशी सूचना मिळते. वेगवेगळया संदर्भांच्या अनुषंगाने एकाच वाक्याचे अनेक अर्थ सूचित होतात. अभिधा अणि लक्षणेचे कार्य संपवल्यानंतर व्यंजनेचे कार्य सुरू होते.

**अभिनव गुप्ताने** व्यंजनाव्यापाराने हा अलौकिक मानला आहे. व्यंग्यार्थ किंवा ध्वन्यर्थ समजण्यासाठी कवीप्रमाणेच श्रोत्यांच्या ठिकाणीही प्रतिभा आणि कल्पनाशक्तीही असली पाहिजे. कवीने आपल्याा प्रतिभेच्या साहाय्याने शब्दार्थांच्यावर केलेले संस्कार कळण्यासाठी वाचकाला व्यंतनाव्यापाराचा आश्रय घ्यावा लागतो. म्हणूनच आनंदवर्धनाने 'ध्वनी हा काव्याचा आत्मा आहे.' असा सिद्धांत मांडला. व्यंग्यार्थ म्हणजचे ध्वनी होय.

**डॉ. स.रा. गाडगीळ** यांनी ध्वनीचे महत्व व स्वरूप स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते '' शब्दांच्या वाच्यार्थाहून वेगळा असा अर्थ तो ध्वन्यर्थ होय.'' शब्दांच्या वाच्यार्थाहून वेगळा असा अर्थ शब्दोच्चाराबरोबर व्यक्त होतो., हेच काव्याचे प्राणभूत तत्व होय. ज्या ठिकाणी शब्द आणि वाच्यार्थ स्वत: गौण बनून सूचित अर्थ व्यक्त करतात त्या काव्याला ध्वनी असे नाव आहे.

कधीकधी संपूर्ण कविता व्यंजक असते. भा. रा. तांबे यांची 'नववधू प्रिया मी बावरते' ही कविता वाच्यार्थाने घेतली तरी काव्यमय आहे. या संपूर्ण कवितेत व्यंजनाही दिसून येते. नववधूच्या मनात पहिल्यांदा सासरी जातांना येणारे भय, लज्जा, प्रेम हे भाव उत्पन्न होतात. तिचे मन कावरेबावरे होते. हा या कवितेचा वाच्यार्थ होय. पण व्यंजनेने नववधू म्हणजे 'आत्मा' आणि सासर म्हणजे 'परमात्मा' होय. जीवाशिवाचे मीलन , जीवाची शिवाला मोक्षपदी नेण्याची प्रार्थना या ध्वन्यर्थानेही ही कविता काव्यात्म होते. कवितेतील हा आध्यात्मिक अर्थ कळण्यासाठी कवीप्रमाणे वाचकाजवळ बहुश्रुतता, प्रतिभा असणे आवश्यक असते. हा अर्थच ध्वन्यर्थ किंवा व्यंग्यार्थ होय. यामुळे लेखन अधिक आकर्षक व रम्य होते. लक्षणेपेक्षा यात काव्य अधिक समृद्ध असते. म्हणून काव्याच्या तीन शक्तींपैकी व्यंजना हीच काव्याला सर्वात अनुकूल असते.

**२) व्यंजनेचे प्रकार :** व्यंजनाशक्ती दोन प्रकारची असते. १) शाब्दी व्यंजना २) आर्थी व्यजना. शाब्दी व्यंजनेचे दोन उपप्रकार पडतात अ) अभिधामूलक व्यंजना ब) लक्षणामूलक व्यंजना. आर्थी व्यंजनेचेही तीन उपप्रकार पडतात. क) वस्तुध्वनी ख) अलंकारध्वनी ग) रसध्वनी.

१) शाब्दी व्यंजना : शब्दांशी निगडित असलेली शाब्दी व्यंजना होय. हा ध्वनिव्यापार शब्दांवर आधरित असतो. काव्यात नुसता शब्द आणि नुसता अर्थ यांना महत्व नसते. शब्द आणि अर्थ एकरूपच असतात. जेथे शब्दांला अधिक प्राधान्य आहे, त्यामानाने अर्थाला दुय्यम स्थान आहे तेथे शाब्दी व्यंजना होते. जेथे अर्थाला अधिक प्राधान्य आहे, त्यामानाने शब्दांला दुय्यम स्थान आहे तेथे आर्थी व्यजना होते. शाब्दी व्यंजनेचे दोन उपप्रकार पडतात अ) अभिधामूलक व्यंजना ब) लक्षणामूलक व्यंजना.

**अ) अभिधामूलक व्यंजना : जेंव्हा** व्यंग्यार्थ दोन अर्थी शब्दांवर अवलंबून असतो तेंव्हा अभिधामूलक व्यंजना होते. उदा. कर, हरी, तीर या शब्दाचे दोन दोन अर्थ आहेत. यातील एखाद्या शब्दावर ही व्यंजना अवलंबून असते. कोल्हटकरांच्या 'मूकनायक'नाटकातील 'मुका' हे अभिधामूलक व्यंजनाचे उदाहरण होय. इथे एकाच शब्दाचे दोन अर्थ आहेत यातील एक मुख्यार्थ असतो तर दुसार वाच्यार्थ असतो. पण वाचकाला हे दोन्ही अर्थ लक्षात येतात. म्हणून या व्यंजनेस अभिधामूलक व्यंजना असे म्हणतात. 'भावबंधन' नाटकातील प्रभाकर 'मी मुक्याचे व्रत सोडणार नाही' असे म्हणतो तेंव्हा ' मी मौनव्रत धरले आहे' असे त्याला सांगावयाचे असते. त्याचवेळी 'मुक्याचे व्रत' या शब्दामधून 'चुंबनव्रत' हा दुसरा वाच्यार्थ अप्रस्तुत असूनही ध्वनित होतो. हाच व्यंजनाव्यापार होय.

• **श्लेष अलंकार आणि अभिधामूलक व्यंजना :** अनेकार्थी शब्दयोजनेत जेंव्हा प्रस्तुत आणि अप्रस्तुत दोन्हीचाही बोध होतो तेंव्हा श्लेष अलंकार होतो. श्लेषमध्ये दोन्ही अर्थ वाच्य असतात. 'ईश्वराशी पूजिले सुमनाने' या ओळींचे दोन अर्थ निघतात. पहिला मीणजे ' ईश्वराची पूजा फूलांनी केली' व दुसरा अर्थ ' ईश्वराची पूजा चांगल्या मनाने केली' विरहव्याकुळ दमयंती जेंव्हा ' औषध न लगे मजला' असे म्हणते त्यावेळी 'मला औषधाची गरज नाही ' असे सख्यांना सांगते तर दुस—या अर्थाने ' नळराजा हेच अभिधामूलक व्यंजना हा व्यंजनेचा एक प्रकार असला तरी तो केवळ दोन शब्दांवर अवलंबून असतो. त्यामुळे व्यंतनंच्या प्रांतात त्याला गौण स्थान आहे.

**ब) लक्षणामूलक व्यंजना :** अनेक वेळा लक्षणेमागील प्रयोजन लक्षणा व्यापारानेही कळत नाही अशावेळी तिथेव्यंजनेचा आश्रय घ्यावा लागतो , हीच लक्षणामूलक व्यंजना होय. 'माझ्या ग दारावरनं । कोण्या राजाचा हत्ती गेला. ।' या ओळीतील दार या शब्दाचा वाच्यार्थ घेताच येत नाही. दार म्हणजे 'दाराजवळचा रस्ता' असा लक्ष्यार्थ घेतला तर बोलणा—याच्या मनातील अतिनिकटत्वाचा अर्थ व्यक्त होतो. ही अतिनिकटत्वाचा अर्थ व्यंजनेनेच व्यक्त होतो म्हणून ही लक्षणामूलक व्यंजना होय.

बालकवींच्या ' संध्यातारका', प्रेम—लेख', 'फुलराणी', 'औदुंबर', 'पारवा', 'पाखरास', 'तृणपुष्प' यासारख्या कवितेतून लक्षणामूलक व्यंजना व्यापार दिसून येतो. 'तृणपुष्प' या कवितेत तृणपुष्पाला सृष्टीदेवीचा चिमुकला बाळ म्हटले आहे. तृणपुष्पावर चेतनगुणोक्तीचा आरोप करून कवितेतील ध्वन्यार्थातून तृणपुष्पाच्या आनंदी आणि उत्साही व्यक्तिमत्वाचे प्रसन्न दर्शन घडविले आहे. 'संध्यारजनी' या कवितेत अस्ताला निघलेला भास्कर आणि जवळच असलेली पश्चित दिशा या प्रियकर—प्रेयसीच्या प्रेमभेटीचे बहारदार वर्णन केले आहे. भास्कर आणि पश्चिम दिशा यांच्यावर कवीने चैतन्याचा अरोप केला आहे. पश्चिमेची प्रणयविद्ध मन:स्थिती, लज्जा भास्कराने तिचे घेतलेले चुंबन यांचे बहारदार चित्रण कवीने केले आहे इथे प्रणयातील मनोवेधक अविष्कार हे लक्ष्यार्थाचे प्रयोजन आहे. लक्षणामूलक व्यंजना नितांत सुंदर अविष्कार इथे पहावयास मिळतो.

२) आर्थी व्यजना : काव्यात नुसता शब्द आणि नुसता अर्थ यांना महत्व नसते. शब्द आणि अर्थ एकरूपच असतात जेथे अर्थाला अधिक प्राधान्य आहे, त्यामानाने शब्दांला दुय्यम स्थान आहे तेथे आर्थी व्यजना होते. शब्दांचे वाच्यार्थ एकापेक्षा अधिक नसतांना वाच्यार्थाहून भिन्न आणि हृदयंगम असा अर्थ वाचकांच्या मनापुढे येवू लागतो.त्याला वाच्यार्थ किंवा लक्ष्यार्थ वाचक शब्दांचे साहाय्य मुळीच लागत नाही. हा केवळ अर्थव्यापार आहे म्हणूनच या व्यंजनेस आर्थी व्यजना असे म्हणतात.

कुसुमाग्रजांची 'फुलण्यापूर्वीच' ही कविता या संदर्भात लक्षणीय आहे. एक कळी उमलत होती. फूल होता होताच हिंस्त्र किटकांच्या क्रूर लालसेने तिचा बळी घेतला. तिच्या अंगातील रंग, रूप, गंध नुकतेच जागे होत होते. ही सुंदर कळी त्या पापी किडयांच्या आघातांनी छिन्नविच्छिन्न होऊन मातीत पडली. हा वाच्यार्थ सुंदर आहेच. याचा व्यंजनेनेही अर्थ हृदयस्पर्शी आहे. ही 'कळी' म्हणजे 'युवती'. तिचे सौंदर्य हळूहळू विकसित होत होते अशा उमलत्या काळात गुंडांनी तिच्यावर पाशवी बलात्कार करून तिचा खून केला.मानवतेला

काळिमा फासणारे हे कृत्य समाजात घडते.त्या मोहक युवतीच्या रूपाने उमलणारे जग मातीमध्ये विसावते. या घटनेवर आधारित हे शब्दचित्र ! यातून कुसुमाग्रजांनी व्यंग्यार्थाने किंवा ध्वन्यर्थाने समाजात युवतींवर होत असलेल्या क्रूर बलात्काराच्या घटनांकडे अचूक निर्देश केला आहे. या कवितेतून उलगडणारा हा दुसरा अर्थ होय. हा दुसरा अर्थ सुचविण्यासाठी कवीने कवितेत एकाही दोन अर्थाच्या शब्दांची योजना केलेली नाही. तरीसुद्धा हा दुसरा अर्थ रसिकांना भावतो, त्यांच्या मनात भाव निर्माण करता. हीच आर्थी व्यजना होय. कुसुमाग्रजांच्या 'अहि–नकुल', 'आगगाडी आणि जमीन', 'माळाचे मनोगत' या कविता जसा वाच्यार्थ व्यक्त करतात तसाच व्यंग्यार्थही प्रकट करतात. आर्थी व्यंजनेचेही तीन उपप्रकार पडतात. क) वस्तुध्वनी ख) अलंकारध्वनी ग) रसध्वनी.

**क) वस्तुध्वनी :** वाच्यार्थातून व्यक्त होणारा व्यंग्यार्थ जेंव्हा केवळ एखाद्या वस्तूचा वा कल्पनेचा अविष्कार करतो तेंव्हा तेथे वस्तुध्वनी व्यंजना होते. **उदा. 'गाडी आली'** या वाक्यातून ते वाक्य उच्चारणा–या विशिष्ट व्यक्तीला अनुसरून वाचकाला ते भिन्न अर्थ जाणवतात, ते केवळ वस्तूरूप आहे. रेल्वेने जाणारा प्रवासी हे वाक्य उच्चारतो त्यातून '' प्रत्येकाने एक एक पिशवी घेऊन गाडीत चढण्यास सज्ज व्हा '' असे सांगत असतो. हेच वाक्य जेंव्हा कॉलेजचे प्राचार्य सहका–यांना म्हणतात तेंव्हा '' कुलगुरू आले. स्वागताची तयारी करा '' असे सुचवित असतात. विद्यापीठ परीक्षा सुरू असतांना जेंव्हा केंद्रप्रमुख हे वाक्य उच्चातात तेंव्हा ' तपासणी पथक आले. तयारीत राहा ' असे सुचवित असतात. व्यापारी जेंव्हा दुकानातील मजुरांना उद्‌देशून हे वाक्य म्हणतो तेंव्हा '' माल आला. माल उतरून घ्या !'' असे म्हणत असतो. जेंव्हा व्यंग्यार्थाने जाणवणारा भावार्थ, दुस–या प्रकाराने, वाच्यार्थाने सांगता येत असेल तेंव्हा ती वस्तूध्वनी व्यंजना होते.

**ख) अलंकारध्वनी :** अलेकार हा काव्याचा शोभादायक धर्म. पण जेंव्हा मुख्य अर्थाला अलंकृत करणारा अलंकार हाच प्रमुख होतो तेंव्हा अलंकारध्वनी हा प्रकार साधतो. यात अलंकार सूचित केलेला असतो. स्पष्ट नसतो. **भा.रा. तांबे यांची 'कुस्करू नका ही सुमने'** ही कविता अलंकारध्वनीचे उत्कृष्ट उदाहरण होय. कवी रसिकांना 'आपली कवितारूपी सुमने कुस्करू नका' असे म्हणतात. इथे सुमने म्हणजे कविता. ही सुमने चुरगळू नका म्हणजे माझ्या कवितांची उपेक्षा करू नका असे ते म्हणतात. सा फुलांना वास नसला, या प्रसिद्ध नसल्या, यांना मोहक रंग नसला, या काही क्षणांनी वाळणार असल्या तरी या मी चांगल्या मनाने तुम्हाला अर्पण केल्या आहेत. यांना जपा. असे कवी म्हणतात. इथे रूपक अलंकार आहे. 'ही फुलें' असे म्हणतांना

'कविता' असे कुठेच म्हंटले नाही. इथे अलंकार सूचित केला आहे. तो स्पष्ट नाही. अलंकारध्वनीमधील अर्थ वाच्यार्थानेही सांगता येतो.

**ग) रसध्वनी :** रसध्वनीला अलौकिक ध्वनी म्हटले जाते. कारण तो वाच्यार्थाने प्रकट करता येत नाही. त्याचे आकलन होण्यासाठी रसिकाजवळ प्रतिभाशक्ती असावी लागते. **कुसुमाग्रजांची 'आगगाडी आणि जमीन'** या कवितेतील आगगाडी ही हुकूमशाही वृत्तीचे प्रतिनिधित्व करते, तर जमीन ही सहनशील शक्तीचे प्रतिनिधित्व करते. आगगाडी जमिनीवर अत्याचार करते. सर्वसामान्य प्रजा जागी झाली तर हुकुमशहाचा अंत ठरलेला आहे. जमीनीचा स्वभिमान जागा होतो आणि उद्दाम गाडी उलटीपालटी होवून पडते. ध्वन्यर्थ किंवा व्यंग्यार्थ इथे समर्थपणे व्यक्त होतांना दिसतो. अर्थात हा व्यंग्यार्थ प्रतिभावान रसिकालाच कळतो. इथली रसध्वनी व्यंजना रसिकांना वेगळयाच विश्वात घेवून जाते.

**माधवराव पटवर्धन** यांच्या **'संगमोत्सुक डोह'** या काव्या डोह आणि सरिता यांच्या प्रतिमांमधून प्रियकर प्रेयसीच्या यांच्या मीलनाचे चित्र रेखटले आहे. इथे उत्कंठा, उत्सुकता, विरहाची तीव्रता, मीलनाचा आनंद आणि आर्तता यांचा प्रत्यय येतो. या भावनांचा प्रत्यय प्रतिभाशाली रसिकालाच येतो. हीच रसध्वनी व्यंजना होय.

व्यंजनाशक्तीचे स्वरूप आणि महत्व : कोणताही शब्द एकतर वाच्यार्थ व्यक्त करतो. किंवा लक्ष्यार्थ तरी व्यक्त करतो. हे दोन्हा अर्थ शब्द एकाचवेळी व्यक्त करू शकत नाही. मात्र व्यंजना ही शब्दशक्ती वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ दोन्हीवर आधारित असते. साहित्यात व्यंग्यार्थाला महत्वाचे स्थान असते. हा व्यंग्यार्थ समजण्यासाठी वाच्यार्थ किंवा लक्ष्यार्थ लक्षात योणे आवश्सक आहे. रसिक वाचक दोन्हीच्या मदतीने व्यंग्यार्थापर्यंत पोहचत असतो. रसध्वनी ही कल्पना ' काव्याचा आत्मा ध्वनी ' या सिद्धांतां गृहीत आहे.

शास्त्रीय साहित्यात वाच्यार्थच महत्वाचा असतो. साहित्यात मात्र वाच्यार्थापेक्षा लक्ष्यार्थाला आणि लक्ष्यार्थापक्षाही सर्वाधिक तहत्व व्यग्यार्थाला आहे.त्यातही शाब्दी व्यंतनेपेक्षाही आर्थी व्यंजना अधिक कार्यशील असते. व्यंजनेल 'काव्याचा आत्मा मानणारा एक संपगदाय' अभिनव गुप्तापासून निर्माण झाला. अभिनव गुप्ताने 'ध्वनीला काव्याचे आत्मपद' दिले आहे. भामहने 'वक्रोक्ती हेच काव्याचे जीवित' असे सांगितले. काही्पमाणात दण्डीच्या 'अग्राम्योक्तीमध्येही' हाच अर्थ अभिप्रेत आहे. आनंदवर्धननेही 'ध्वनी हाच

काव्याचा आत्मा होय' असे मानले. साहित्यातील सौंदर्य एकीकडे वाचकांना आनंद देते तर साहित्यातील वास्तवजीवनचित्रण दुस–या बाजूने अस्वस्थ करते. साहित्यातील हे सूचन इतर कलांपेक्षा अधिक संवेदनशील असते आणि हेच सूचन व्यंग्यार्थाने, ध्वन्यर्थाने अथवा रसध्वनीने सिद्ध झालेले असते.

# मराठी साहित्य अभ्यासक्रम 2019 – 20

## बी. ए. चवथे सत्र

अभ्यासग्रंथ 1) **रसयात्रा कुसुमाग्रज (कवितासंग्रह) —** संपा. – बोरकर , वैद्य

घटक १

- मराठी काव्याचा प्रवाह
- काव्य संकल्पना, कवितेची व्याख्या
- कवितेचे प्रकार – स्वरूप , वैशिष्ट्ये
- कवितेचे घटक – शब्द, नाद, अलंकार, वृत्त, प्रतिमा,प्रतीक इ.

घटक २

- कुसुमाग्रजांची काव्यविषयक जाण
- कुसुमाग्रजांची सामाजिक कविता
- कुसुमाग्रजांची प्रेम कविता
- कुसुमाग्रजांची राष्ट्रभक्तीपर कविता
- कुसुमाग्रजांच्या कवितेतील प्रतिमा प्रतिके भाषासौंदर्य

2) **काव्यशास्त्र परिचय :** . डॉ. शिवशंकर उपासे

- काव्यकारण
- शब्दशक्ती आणि अर्थविचार

## बी.ए.भाग –२/ सत्र चवथे –मराठी साहित्य – अपेक्षित प्रश्न

### दीर्घोत्तरी प्रश्न

प्रश्न १ : मराठी काव्याच्या विविध प्रवाहाचे विवेचन करा

प्रश्न २ : काव्याची संकल्पना स्पष्ट करून त्याचे स्वरूप विशद करा.

प्रश्न ३ : कवितेचे प्रकार सांगून स्वरूप व वैशिष्ट्यांची चर्चा करा.

प्रश्न ४ : कवितेचे घटक स्पष्ट करा.

प्रश्न ५ : शब्द, नाद, अलेकार या काव्यघटकांचे सविस्तर विवेचन करा.

प्रश्न ६ : प्रतिमा आणि प्रतीके यांचे स्वरूप स्पष्ट करा.

प्रश्न ७ : कुसुमाग्रजांचा काव्यविषयक स्पष्ट करा

प्रश्न ८ : कुसुमाग्रजांच्या सामाजिक कवितेचे स्वरूप स्पष्ट करा.

प्रश्न ९ : कुसुमाग्रजांच्या प्रेम कवितेचे स्वरूप स्पष्ट करा.

प्रश्न १० : कुसुमाग्रजांच्याा राष्ट्रभक्तीपर कवितेचे स्वरूप स्पष्ट करा

प्रश्न ११ : कुसुमाग्रजांच्या कवितेतील प्रतिमा प्रतिके भाषासौंदर्य यांचे स्वरूप उलगडून दाखवा

प्रश्न १२ : ‘पृथ्वीचे प्रेमगीत’ या कवितेचे रसग्रहण करा.

प्रश्न १३ : ‘गर्जा जयजयकार’ या कवितेचे रसग्रहण करा.

प्रश्न १४ : ‘हिमलाट ’ या कवितेचे रूपक उलगडून दाखवा.

प्रश्न १५ : ‘जालियनवाला बाग’ या कवितेतून इंग्रजांच्या क्रौर्याचे वर्णन कवाने कसे केले आहे?

प्रश्न १६ : ‘विराट वड’ ची या अवस्थेतून सुटका करण्यास कोण समर्थ आहे?

प्रश्न १७ : ‘मायउेधचा वारा’ कवीला कोण्कोणत्या गोष्टींचे स्मरण करून देतो. ?

प्रश्न १८ : मानवतेच्या –हासाचे चित्र कवीने ‘झाड’ मधून कसे रेखाटले आहे?

प्रश्न १९ : प्रेमातील समर्पणाचे चित्र ‘शेवटचे पान’ मधून कसे अधोरेखित झाले आहे?

## लघुत्तरी प्रश्न

१ येशूच्या काळजात आणखीन एक जखम झाली असेल असे कवी का म्हणतात?

२ फेरीवाल्याने काय विकायला आणले आहे?

३ उषेला कोणते स्वप्न पडले?

४ 'स्वप्नाच्या समाप्ती' मधील प्रियकर आपल्या सखीची कशी असजूत घालत आहे?

५ माती माणसाला कोणता इशारा देत आहे?

६ काळोखावर तेजाची लेणी कोण व कां खोदत बसला आहे?

७ 'पाऊलचिन्हे' मधून कवीने ईश्वराच्या अस्तित्वासंबंधी कोणता विचार मांडला आहे,

८ 'हिमलाट'अधून कवीने विषमतेचे कसे चित्र रंखाटले आहे.?

९ 'हा चंद्र' मधून चंद्राच्या विविण भावच्छटोचे वण्रन कवाीने कसे केले आहे?

१० सैनिकांच्या बलिदानाचा गौरव कवाने कसा केला आहे?

११ झाडावरील पक्षाने प्राणांतिक किंकाळी कां फोडली?

१२ आपल्या गीताचे कोणते एकच 'धृवपद' आहे असे कवी म्हणतात?

१३ कवी आपल्या कवितांना 'समिधा'असे कां म्हणतात?

१४ कोलेबस आपल्या सहका—यांना कोणता संदेश देत आहे?

१५ 'प्रीतीसाठी प्रीती' मधून प्रीतीचे महत्व कवीने कसे विशद केले आहे?

१६ 'हिमलाटे'चा प्रतिकार करण्यासाठी कवी कोणाला व कां आवाहन करीत आहे?

१७ 'पुनवे' च्या रात्रीचे वर्णन कवीने कसे केले आहे?

१८ 'टिळकांच्या पुतळयाकडे' बघून कवीच्या मनातील कोलाहल कसा शांत होतां?

२० 'उत्तररात्री' पर्यंत कवी कां जागत आहे?

२१ मराठे सरदारांच्या शौर्याचे वर्णन 'सात' मधून कवीने कसे केले आहे?

२२ नि:शब्द प्रेमाची महती 'भावमोहन' मधून कशी व्यक्त झाली आहे?

२३ 'अहि—नकूल' च्या संग्रामाचे वर्णन करा.

२४ 'ताजमहाल'चे वर्णन कवीने कसे केले आहे?

## काव्यशास्त्र परिचय

१ शब्दांची सर्वप्रथम आणि प्रमुख शक्तीचे स्वरूप स्पष्ट करा.

२ अभिधा शक्ती म्हणजे काय ते सांगून तिचे स्वरूप स्पष्ट करा.

३ अभिधा शक्ती म्हणजे काय ते सांगून तिचे प्रकार विशद करा.

४ लक्षणा शक्ती म्हणजे काय ते सांगून तिचे स्वरूप स्पष्ट करा

५ लक्षणा शक्ती म्हणजे काय ते सांगून तिचे प्रकार स्पष्ट करा.

६ लक्षणा शक्ती म्हणजे काय ते सांगून तिचे प्रकार स्पष्ट करा.

७ योगरूढ शब्दाचे स्वरूप स्पष्ट करा.

८ निरूढा लक्षणेचे स्वरूप स्पष्ट करा.

९ प्रयोजनवती लक्षणेचे स्वरूप सांगून त्यांचे प्रकार स्पष्ट करा.

१० शुद्धा लक्षणेचे प्रकार सांगून त्यांचे स्वरूप स्पष्ट करा .

११ लक्षणेतील काव्याचे स्वरूप स्पष्ट करा

१२ व्यंजना शक्ती म्हणजे काय ते सांगून तिचे प्रकार स्पष्ट करा

१३ शाब्दी व्यंजना म्हणजे काय ते सांगून तिचे प्रकार स्पष्ट करा

१४ आर्थी व्यंजना म्हणजे काय ते सांगून तिचे प्रकार स्पष्ट करा

१५ वस्तूध्वनीचे स्वरूप स्पष्ट करा

१६ अलंकारध्वनीचे स्वरूप स्पष्ट करा

१७ रसध्वनीचे स्वरूप स्पष्ट करा

१८ व्यंजनाशक्तीचे स्वरूप आणि महत्व स्पष्ट करा

१९ काव्यनिर्मितीला कारणीभूत कोणती कारणे संस्कृत साहित्यज्ञानी सांगितली आहेत.?

२० प्रतिभा म्हणजे काय ते सांगून तिचे स्वरूप स्पष्ट करा

२१ प्रतिभा एक अलौकिक शक्ती' आहे असे कां म्हणतात?

२२ प्रतिभा ही वेडाची बहीण ' आहे असे कां म्हणतात?

२३ प्रतिभेचे स्वरूप व वैशिष्टे विशद करा.

२४ प्रतिभेच्या विविध व्याख्यांचा साधार परामर्श घ्या.

२५ प्रतिभेचे विविध कार्ये आणि अंगे सांगा

२६ प्रतिभेसाठी कोणते गुण आवश्यक असतात?

२७ स्फूर्ती म्हणजे काय?

२८ उत्प्रेक्षण म्हणजे काय?

२९ भावनात्मकता म्हणजे काय?

३० कल्पनाशक्ती आणि साहानुभाव म्हणजे काय?

३१ काव्यनिर्मितीस आवश्यक कारणे कोणती?

३२ काव्यनिर्मितीस साहाय्यक कारणे कोणती?

३३ व्युत्पन्नतेचे स्वरूप स्पष्ट करा.

३४ काव्यनिर्मितीस आवश्यक असणा—या 'अभ्यास' या कारणाचे स्वरूप स्पष्ट कर

३५ मानसिक स्वास्थ्याचे स्वरूप स्पष्ट करा

३६ शारीरिक स्वास्थ्य म्हणजे काय?

३७ काव्यनिर्मितीस आवश्यक असणा—या 'परिस्थिती' या कारणाचे स्वरूप स्पष्ट करा